
चिंघिज़ आयत्मातोव

जामील्या



चिंघिझ आयत्मातोव – सोविएत बहुराष्ट्रिक गद्यामधील एक नामवंत आणि ठळक लेखक. लेनिन पारितोषिकाचे आणि सोविएत संघ राज्याच्या सरकारी पारितोषिकाचे मानकरी, अनेक पुस्तकांचे लेखन, सोविएत व परदेशी वाचकांमध्ये अमाप लोकप्रियता.

...चिंघिझ आयत्मातोव यांची 'जामील्या' ही पहिली कहाणी सुमारे तीस वर्षांपूर्वी प्रकाशित झाली होती. पण वाचकांचे तिच्याबद्दल अजूनही कुतूहल शमत नाही. स्वत:च्या सुखाचा हक्क सांगणाऱ्या महिलेच्या ह्या काव्यमय कथेला अनेक देशांमध्ये जाणतात. फ्रेंच लेखक लुई आरागोन म्हणाले होते की, "'जामील्या' जगात सर्वांत सुंदर प्रेमकहाणी आहे."



चिंगिज़ आयत्मातोव

जामील्या

कादंबरिका

रादुगा प्रकाशन · मास्को

अनुवाद: अनिल हवालदार
सजावट: आ. अल्तूनीन

Чингиз Айтматов
ДЖАМИЛЯ
Повесть

На языке маратхи

Chinghiz Aitmatov
JAMILA
A novella

In Marathi

माननीय वाचक!

प्रस्तुत पुस्तकाबाबतची आपली मते आणि सूचना जाणून घेण्यास आम्हाला आनंद वाटेल.

रशियन आणि सोविएत साहित्याचे तुमच्या मातृभाषेतील अनुवाद आमच्या लोकांच्या संस्कृतीची व जीवनाची सखोल ओळख करून घेण्यास आपल्याला मदत करतील अशी आशा आहे.

आमचा पत्ता: 'रादुगा' प्रकाशन, १७ झूबोवस्की बुलवार, मॉस्को ११९०२१, सोविएत संघ.

सोविएत संघात मुद्रित

ISBN 5-05-003017-X

बापांच्या आणि मोठ्या भावांच्या ओव्हरकोटांमध्ये वाढलेल्या माझ्या समवयस्कांना.

साध्या चौकटीतील ह्या छोट्या चित्रासमोर मी पुन्हा उभा राहिलोय. उद्या मला खेड्यात जायला पाहिजे, चित्राकडे मी खूप वेळ आणि टक लावून बघतोय, जणू प्रवासाला ते मला चांगला सल्ला देऊ शकेल.

हे चित्र मी कधीही प्रदर्शनात मांडले नाही. शिवाय जेव्हा गावातून नातेवाईक माझ्याकडे येतात, तेव्हा मी ते दृष्टीआड लपवतो. जरी ते उत्तम कलाकृती नसले, तरी त्याच्याबद्दल लाजण्यासारखे नाही. त्यात चितारलेल्या जमिनीसारखे ते साधे आहे.

शारदीय उदास आकाशाची चित्रात पार्श्वभूमी आहे. वेगाने सरकणाऱ्या ठिपकेदार मेघांना वारा दूर पर्वतराजीकडे पळवतोय. पुढच्या भागात तांबूस-तपकिरी कडू दवण्याने आच्छादित स्तेप, नुकत्याच पडून गेलेल्या पावसामुळे काळा बनलेला व अजून न सुकलेला रस्ता. रस्त्याकडे दाटलेल्या टोकदार गवताचे झुबके. घोडागाडीच्या धुवून गेलेल्या चाकोरीमागोमाग गेलेले दोन वाटसरूंचे पायांचे ठसे. दूरवर रस्ता वळतो तेथे

ते ठसे अंधुक बनत जातात. जणू ते आणखी एक पाऊल टाकणार—आणि चौकटीपलिकडे जाणार, असे भासते. त्यांपैकी एक... मी थोडा आधी धावतोय.

माझ्या बालपणची ही गोष्ट. युद्धाचे तिसरे वर्ष होते. दूरच्या आघाडीवर कूर्स्क आणि ओरेलपाशी आमचे बाप व भाऊ लढत होते आणि आम्ही पंधरा वर्षांची पोरे सामुदायिक शेतावर काम करत होतो. आमच्या दुबळ्या खांद्यांना शेतकऱ्याच्या कठीण श्रमांना पार पाडावे लागत होते. कापणीचा मोसम सर्वांत कठीण काळ. आम्ही घरापासून कित्येक आठवडेपर्यंत दूर होतो, झोडपणीच्या खळ्यावर रात्रंदिवस होतो अथवा रेल्वे स्टेशनच्या रस्त्यावरून धान्य वाहून नेत होतो.

आमचे कोयते कापणीमुळे तापलेले होते अशा रणरणीत उन्हाच्या दिवशी स्टेशनवरून रिकामी गाडी हाकत आणताना मी घरी थांबायचे ठरविले.

टेकाडावरच्या रस्त्याच्या टोकाशी फाटचाजवळ दोन घरे आहेत, त्यांच्याभोवती भक्कम भिंतीचे कुंपण घातलेले आहे, भिंतीपलिकडे दोन चिनारांची उंच झाडे उभी आहेत. ही आमची घरे आहेत. आमची कुटुंबे अनेक वर्षेपर्यंत एकमेकांशेजारी राहिली आहेत. मी स्वतः मोठ्या घरातला. मला दोन भाऊ होते, दोघेही माझ्यापेक्षा थोरले होते, दोघे बिनलग्नाचे होते, युद्धाच्या आघाडीवर गेले, फार काळापासून त्यांची बातमी नव्हती.

माझे वडील म्हातारे सुतार होते, पहाटे नमाज केल्यानंतर सामायिक अंगणातील सुतारशाळेत जात. संध्याकाळी उशीरा ते परत येत असत.

घरात आई व बहीण होत्या.

शेजारच्या घराला गावात धाकटे घर म्हणत, त्यात आमचे जवळचे नातेवाईक रहात. आमचे आजोबा किंवा पणजोबा भाऊ होते, पण मी त्यांना जवळचे नातेवाईक म्हणतो कारण आम्ही एकाच कुटुंबात रहात होतो. आमचे लोक भटके होते, आमचे पूर्वज छावणी मोडत व गुरांना एकत्र करत, आम्ही ही परंपरा अजून जिवंत ठेवलीय. जेव्हा आमचे गाव सामुदायिक बनले, तेव्हा आमच्या बापांनी आमची घरे शेजारी शेजारी बांधली. प्रत्यक्षात संपूर्ण आरालस्काया रस्त्यावर आम्ही सर्व एकाच टोळीत होतो. हा रस्ता गावातून नदीपर्यंत जायचा.

सामुदायिक शेतात आम्ही दाखल झाल्यानंतर धाकट्या घराचा मालक मेला. त्याच्यामागे त्याची बायको व दोन लहान मुलगे होते. टोळीच्या जुन्या नियमानुसार – अजूनही हा नियम पाळतात – मुले असलेल्या विधवेला टोळी सोडण्यास मनाई आहे, म्हणून आमच्या टोळीवाल्यांनी माझ्या वडलांचे तिच्याशी लग्न लावले. तसे करणे त्यांचे कर्तव्य होते, कारण ते मयताचे जवळचे नातेवाईक होते.

अशा रीतीने आमचे दुसरे कुटुंब बनले. धाकटे घर स्वतंत्र मानण्यात येत होते: त्याची मालमत्ता

होती, गुरे होती, पण प्रत्यक्षात आम्ही एकत्र रहात होतो.

धाकटचा घरातूनसुद्धा दोन मुलग्यांना सैन्यात धाडले होते. थोरला सादिक लग्नानंतर ताबडतोब आघाडीवर गेला होता, त्याच्याकडून छोटी पत्रे खूप कालांतराने येत होती.

धाकटचा घरात आई रहात होती – तिला "किची-आपा" म्हणत म्हणजे धाकटी आई – आणि तिची सून, सादिकची बायको. दोघीही सकाळपासून संध्याकाळपर्यंत सामुदायिक शेतावर राबत होत्या. माझी धाकटी आई प्रेमळ, समाधानी, सुस्वभावी बाई होती. कालवे खणण्यात, शेतांना पाणी घालण्यात अशा कामांमध्ये ती इतर तरुण बायकांच्या तोडीने काम करत होती. कष्टाळू सुनेच्या रूपाने नशीबाने तिला देणगी लाभलेली होती. जामील्या सासूला शोभत होती: कधीही दमत नव्हती, चपळ, मात्र तिचा स्वभाव वेगळा होता.

जामील्या मला खूप आवडत होती. मी तिला आवडत होतो. आमची छान मैत्री होती, पण एकमेकांच्या नावाने हाका मारत नव्हतो. जर आम्ही वेगळ्या कुटुंबांमधले असतो, तर मी नक्कीच जामील्याला नावाने हाक मारली असती. पण मी तिला "जेने" म्हणत होतो, आमच्यात थोरल्या भावाच्या बायकोला असे म्हणतात व ती मला "किचिने बाला" म्हणायची, ह्याचा अर्थ लहान

बाळ, खरे तर मी मुळीच बाळ नव्हतो, आमच्यात वयाचा फरक अगदी कमी होता. पण गावात सुना नवऱ्याच्या धाकट्या भावांना "किचिने बाला" अथवा "मोय कायनी" म्हणायच्या.

माझी आई दोन्ही अंगणांमध्ये घरकाम करत होती, तिला बहीण मदत करायची, वेण्या घालणारी माझी बहीण मजेदार मुलगी होती. त्या कठीण दिवसांमध्ये ती किती काम करायची हे मी कधीही विसरणार नाही. दोन्ही घरच्या कोकरांना आणि वासरांना ती चारायला न्यायची, जळणाला गोवऱ्या गोळा करायची. माझी अपऱ्या नाकाची बहीण माझ्या आईचा एकलेपणा नाहीसा करायची, लढाईत बेपत्ता झालेल्या दोन मुलांबद्दलचे आईचे उदास विचार स्वतःच्या खोडयांनी पळवून लावायची.

आमच्या मोठ्या कुटुंबात सुसंवाद होता, त्याचे श्रेय प्रामुख्याने माझ्या आईकडे होते. दोन्ही घरांची ती पूर्ण मालकीण होती, दोन्ही चुलींची रक्षणकर्त्री होती. आमच्या भटक्या पूर्वजांच्या कुटुंबात ती अगदी तरुण वयात आली, तिने त्यांच्या आठवणीचा चांगला आदर केला, पूर्वजांच्या कुटुंबांचा कारभार न्यायीपणाने चालविला. शहाणपणाने, भलेपणाने, कार्यक्षमतेने ती घर चालवायची, त्यामुळे गावात तिला मान देत. घरात आई सर्व मुख्त्यार होती. खरे तर गावकरी माझ्या वडलांना कुटुंब-प्रमुख कधीही मानत नसत. ते म्हणायचे: "त्या ऊस्ताकाकडं जाऊ नको–आमच्याकडे

कारागिराला ऊस्ताका म्हणायचे–त्याला फक्त स्वतःची कुऱ्हाड माहीत आहे, त्यांच्याकडे थोरली आई सर्व बाबतीत मुख्य आहे. तिच्यापाशी जाणं जास्त चांगलं."

माझे वय लहान असूनही मी वारंवार घरच्या भानगडींमध्ये लुडबूड करायचा, माझे थोरले भाऊ युद्धावर गेले असल्यामुळे हे शक्य होते. काही वेळा गंमतीने मला जिगित* म्हणत, पण गंभीरपणेही दोन्ही घरचा रक्षणकर्ता व पोषणकर्ता म्हणत. मला ह्याचा अभिमान वाटायचा, जबाबदारी वाटायची, शिवाय माझी आई स्वतंत्रपणाच्या भावनेला उत्तेजन द्यायची. मी चांगला शेतकरी, उमदा, महत्त्वाकांक्षी बनावे अशी तिची इच्छा होती. माझ्या वडलांप्रमाणे दिवसभर रंधा मारत मी बनू नये असे तिला वाटायचे.

तर मी घोडागाडी घराजवळच्या वाळुंजीच्या सावलीत थांबवली, लगाम सोडले व अंगणाकडे निघालो, आमच्या पथक-प्रमुख ओरोझमातला मी पाहिले. नेहमीप्रमाणे घोड्याला कुबडी बांधून तो घोड्यावर बसला होता. त्याच्याशेजारी आई उभी होती. ती काहीतरी बोलत होती. जवळ जाताच मला आईचा आवाज ऐकू आला:

"हे शक्य नाही! जरा देवाची भीड राख, बायकांनी गाडीत पोती भरलीत असं कुठं दिसतंय?

* जिगित–कसबी घोडेस्वार.

नाही बाबा, माझ्या सुनेला शांत राहू दे, पूर्वीसारखी काम करू दे. तशी मला सवड नाही, दोन घरचा कारभार चालवायचा म्हणजे सोपं नव्हे! मुलगी मोठी झालीय हे बरं झालं... आठवडाभर वाकवत नाही, कंबर दुखतेय, पाण्याविना मक्याची कणसं वाळलीत!" ती तावातावाने बोलत होती, तिने पगडीचे टोक कॉलरमध्ये खोवले, ती चिडली होती ह्याची ती खूण होती.

"काय चमत्कारिक आहात!" पुढे झुकून ओरोझमात निराशेने म्हणाला. "जर माझा पाय धड असता, हा खुंट नसता तर मी तुमच्याकडं विचारायला आलो असतो? त्यापेक्षा पूर्वीसारखी पोती भरली असती आणि घोडे पिटाळले असते! माहीत आहे, बाईचं हे काम नव्हे, पण पुरुष कुठून घेऊ? म्हणून सैनिकांच्या बायकांना विचारायचं ठरवलंय. तुम्ही तुमच्या सुनेला पाठवत नाही, पण आमचे साहेब लोक आम्हाला टोकतात... सैनिकांना पाव पाहिजे, आपण योजना बिघडवतोय, आता कसं हे जमवायचं?"

जमिनीवर चाबूक खरवडत मी त्याच्यापाशी गेलो आणि जेव्हा त्याने मला पाहिले, तेव्हा तो एकदम आनंदला, बहुधा त्याला नवी कल्पना सुचली.

"जर तुम्ही सुनेच्या बाबतीत भिताय, तर हा बघा तिचा कायनी," त्याने आनंदाने माझ्याकडे बोट दाखविले. "तिच्याजवळ कुणालाही येऊ द्यायचा नाही, मुळीच शंका घेऊ नका! सेईत छान पोरगा आहे.

त्याच्यासारखी पोरं आमची खरी पोषणकर्ती, फक्त तीच मदत करतात..."

आईने पथक-प्रमुखाला बोलू दिले नाही.

"बाई ग, काय भटक्यासारखा अवतार केलास!" ती माझ्यावर ओरडली. "केवढे लांब केस वाढलेत... तुझा बाप थोर, पोराचं डोकं भादरायची त्याला सवड नाही..."

"ठीक आहे, आज मुलाला म्हाताऱ्यांकडून लाड करवून घेऊं दे, डोकं भादरो", ओरोझमातने चपळपणे आईच्या सुरात सूर मिसळला. "सेईत आज घरी रहा, घोड्यांना खाऊ घाल, उद्या सकाळीच जामील्याला घोडागाडी देऊ: एकत्र काम करा. लक्षात ठेव, तिला जबाबदार राहशील. बायबिचे* तुम्ही काळजी करू नका, सेईत तिचा अपमान होऊ देणार नाही. शिवाय त्यांच्याबरोबर दानियारला पाठवीन. तुम्ही त्याला जाणता: अगदी निरुपद्रवी आहे... नुकताच आघाडीवरून परतलाय. तिघेही स्टेशनवर धान्य भरतील. तेव्हा कोण तुमच्या सुनेला धक्का लावील? बरोबर आहे ना सेईत? तुला काय वाटतं, जामील्याला गाडी चालवायचं काम द्यायचं अशी आमची इच्छा आहे, तुझी आई कबूल नाही, तिला समजावून सांग."

ओरोझमातच्या स्तुतीने मी फुशारलो, एखाद्या

---

* बायबिचे – घरातील थोरली मालकीण.

मोठ्या माणसाचा सल्ला घ्यावा असे त्याने मला विचारले होते. शिवाय, जामील्याबरोबर स्टेशनपर्यंत गाडीने जाण्याच्या कल्पनेने मी सुखावलो. गंभीर भाव आणून मी आईला म्हणालो:

"तिला काहीही होणार नाही. लांडगे खातात काय?"

आणि अस्सल गाडीवानाप्रमाणे मी दातांच्या फटीतून थुंकलो, चाबूक मागून फरफटत मी ऐटीत चालत गेलो.

"वा रे शहाणा!" आई चकितपणे उद्गारली, पण त्याच वेळी रागावून ओरडली: "मी दाखवते तुला लांडगे, त्यांच्याबद्दल तुला कुठून माहीत, मोठा शहाणा आलाय!"

"त्याच्याशिवाय दुसऱ्या कुणाला माहीत, तो तुमच्या दोन कुटुंबांचा जिगित, अभिमान बाळगा त्याचा!" ओरोझमातने माझा कैवार घेतला, आई परत हट्ट धरणार नाही अशा भीतीने त्याने कटाक्ष टाकला.

पण आईने त्याला विरोध केला नाही, फक्त एकदम ती हताश बनली व खोल उसासत म्हणाली:

"अजून तो लहान आहे, तरीही दिवस-रात्र राबतोय. एकट्या अल्लाला ठाऊक आहे, कुठं आहेत आमचे जिगित. आमची घरं उठवलेल्या छावण्यांसारखी बनलीत."

आता मी ऐकू जाण्याच्या टप्प्यापलिकडे गेलो

होतो, म्हणून आईचे पुढचे शब्द मला ऐकू आले नाहीत. घराच्या कोपऱ्यावर मी चाबूक मारला, धुळीचा लोट उठवला आणि बहिणीच्या स्मिताला प्रत्युत्तर न देता थेट दाराकडे गेलो. ती अंगणात गोवऱ्या थापत होती. दाराशी बसकण घालून मी हात धुतले, नंतर खोलीत जाऊन ताक प्यायलो आणि खिडकीत कप ठेवला, पावाचे तुकडे त्यात टाकू लागलो.

आई व ओरोझमात अजूनही अंगणात होती. त्यांचा अद्याप वाद चालला नव्हता, पण ती शांतपणे हळू आवाजात बोलत होती. माझ्या भावांबद्दल बोलत असणार. आई बाहीने डोळे पुसत होती, त्याच्या शब्दांना विमनस्कपणे डोके हलवत होती. ओरोझमात बहुधा तिचे सांत्वन करत होता. आईने झाडांच्या शेंड्यांपलिकडे नजर टाकली, जणू तिच्या गढूळ नजरेला तिचे मुलगे दिसणार होते.

स्वत:च्या विचारांमध्ये गढल्यामुळे शेवटी ओरोझमातच्या सूचनेला कबूल झाल्यासारखी दिसली. स्वत:चे उद्दिष्ट साधल्यामुळे खूष होऊन त्याने घोड्याला चाबूक मारला व तो अंगणातून दौडत गेला.

ह्या गोष्टीची कोणती अखेर होणार हे मला किंवा आईला माहीत नव्हते.

जामील्याला दोन घोड्यांची गाडी चालविणे जमेल

ह्याबाबत मला शंका नव्हती. घोड्यांची तिला ओळख होती, कारण बाकाईर ह्या डोंगरगावातील अश्वपालकाची ती मुलगी होती. आमचा सादिकसुद्धा अश्वपालक होता. वसंतात एकदा शर्यतींमध्ये तो जामील्यावर मात करू शकला नव्हता. कोण जाणे, पण म्हणतात की, त्यामुळे अपमानीत होऊन त्याने जामील्याला पळवून नेले. दुसरे काही लोक ठामपणे म्हणत होते की, प्रेमाखातर त्यांनी लग्न केले. काहीही असो, त्यांनी फक्त चार महिने एकत्र काढले. मग युद्ध सुरू झाले, सादिकला सैन्यात बोलावणे आले.

समजावून कसे सांगावे हे मला माहीत नाही, कदाचित, जामील्या लहानपणापासून बापाबरोबर घोडे राखत होती – ती त्याची एकुलती एक होती, तीच मुलगी होती व मुलगा होती – पण तिच्या स्वभावात काहीतरी पुरुषी छटा उमटायच्या. कधी तुटक आणि राकट वागायची. ती पुरुषाच्या जोमाने काम करायची. शेजारणींशी जमवून घ्यायची, पण त्यांनी निष्कारण तिच्यावर टीका केली, तर त्यांना मुळीच जुमानत नव्हती; रागाच्या भरात दुसऱ्या बाईच्या झिंज्यासुद्धा तिने काहीवेळा खेचल्या होत्या.

शेजारी अनेकदा तक्रारी घेऊन येत:

"अशी कशी तुमची सून आहे? नुकता उंबरठा ओलांडून आली तर जिभेचा पट्टा सोडते! ना आदर, ना लाज!"

"ती अशी आहे हेच छान!" ह्यावर आई उत्तर

द्यायची. "आमच्या सुनेला खरं बोलणं आवडतं, सरळ तोंडावर बोलते. मागून तक्रारी करण्यापेक्षा हे जास्त चांगलं. तुमच्या सुना उगीच शांतपणाचा आव आणतात, अशा खालमुंड्या-कुजक्या अंड्यांसारख्या असतात. वरून स्वच्छ गुळगुळीत, पण आतून नाक दाबून धरायला लावतात."

बाबा आणि धाकटी आई सासऱ्याप्रमाणे व सासूप्रमाणे जामील्याशी कधीही कडक वागत नसत. तिच्यावर त्यांचे प्रेम होते.

ती तिच्याशी चांगले वागत, त्यांचे तिच्यावर प्रेम होते. अल्लाशी व नवऱ्याशी ती प्रामाणिक रहावी अशी त्यांची एकमेव इच्छा होती.

मी समजून घेत होतो. चार मुलांना युद्धावर पाठवल्यानंतर, त्यांनी जामील्यामध्ये – दोन घरांच्या एकमेव सुनेत – सांत्वन शोधले. म्हणूनच तिच्या कल्याणाबद्दल त्यांना फार आस्था वाटायची.

माझ्या आईला मी समजलो नव्हतो. उगीच कुणावर तरी प्रेम करणारी ती नव्हती. माझ्या आईचा स्वभाव सत्ता गाजवणारा, कठोर होता. स्वतःच्या नियमांनुसार ती जगत होती, त्या नियमांना तिने कधीही मोडले नाही. दर वसंताच्या सुरुवातीला ती हमखासपणे अंगणात जुना तंबू ठोकायची, त्या तंबूत ती झाडांच्या डहाळ्या पेटवायची. माझ्या वडलांनी तरुणपणी हा तंबू बनवला होता. आम्हाला तिने कष्टाळू बनवले, थोरांचा आदर राखायला शिकवले,

कुटुंबातील प्रत्येकाने आज्ञाधारक असावे अशी तिची अपेक्षा असायची.

जामील्या आमच्याकडे आल्यापासून सून कशी असते तशी नव्हती. एवढे खरे की, थोरांचा तिने आदर राखला, त्यांच्या आज्ञा पाळल्या, पण त्यांच्यासमोर संकोचली नव्हती, डोके कधीही तुकवले नव्हते. त्यांच्या पाठी दुष्टपणे दबत्या आवाजात इतर सुना कशा फूत्कारतात तसे कधीही फूत्कारली नव्हती. मनात असेल ते नेहमी बोलून दाखवायची, स्वतःची मते मांडायला कधी भ्यायची नाही. माझी आई वारंवार तिला पाठिंबा द्यायची व तिच्याशी सहमत व्हायची, पण अखेरचा शब्द आईचा असायचा.

आईला जामील्याचा प्रांजलपणा व न्यायीपणा स्वतःच्या स्वभावासारखा वाटायचा, एके दिवशी जामील्याला प्रभावी मालकीण व बिबिचे बनवायचे असे तिचे स्वप्न असावे, स्वतःप्रमाणे जामील्याला घराची कर्ती बाई ती करू इच्छित होती.

"माझ्या मुली, अल्लाचे आभार मान," आई जामील्याला शिकवायची, "तू भक्कम खानदान घरात आलीस, हे तुझं सुदैव. मुलांना जन्म देणं आणि घरात विपुलता असणं ह्यातच बाईचं सुख असतं. आम्हा म्हाताऱ्यांपाशी जे काही आहे ते सर्व तुझं होईल, सोबतीला थडग्यात घेऊन जाणार नाही. जे मान आणि अब्रू राखतात ते सुखी होतात हे लक्षात ठेव, स्वतःची काळजी घे."

2--905

जामील्यामध्ये असे काहीतरी होते की त्यामुळे तिच्या दोन्ही सास्वा अस्वस्थ बनायच्या ; ती फारच प्रांजल व उल्हासी होती, जणू काही लहान मूल होती. कधी कारण नसताना मोठ्यांदा आणि आनंदाने हसू लागायची. कधी कामावरून परतताना चालत न येता, अंगणातून पाण्याच्या ओहोळावरून उडी मारून धावत यायची. मग कारण नसताना एका सासूला मिठ्या मारायची आणि दुसरीची चुंबने घ्यायची.

जामील्याला गायला आवडायचे, ती सतत काही ना काहीतरी गायची, थोरांना लाजायची नव्हती. अर्थात सुनेच्या वर्तनाबद्दल गावातील कल्पनांच्या चौकटीत हे बसत नव्हते. जामील्या काही काळाने रूळेल असे म्हणून दोन्ही सास्वा स्वतःचे समाधान करून घेत होत्या, कारण लहानपणी त्या अशाच नव्हत्या का? मला मात्र वाटायचे की, जामील्या सर्व जगात उत्तम होती, आम्ही दोघे खूप मजा करत असू, अंगणात खिदळत एकमेकांचा पाठलाग करत असू.

जामील्या खूप सुंदर होती. कमनीय, डौलदार, सरळ राठ केसांच्या दोन वेण्या, कपाळावर ती पांढरा रुमाल तिरपा बांधायची, तिच्या काळसर वर्णाला हे खुलून दिसायचे. जेव्हा ती स्मित करायची, तेव्हा तिच्या निळसर-काळ्या बदामी डोळ्यांमध्ये खोडकर

चमक उमटायची, जेव्हा वात्रटिका गायची, तेव्हा तिचे डोळे चावट बनायचे.

जिगित आणि विशेषत: युद्धआघाडीवरून परतलेले पुरुष तिच्याकडे बघत असत असे माझ्या ध्यानात आले होते. जामील्याला थट्टा आवडायची, पण कुणी जरा जास्त स्वातंत्र्य घेतले, तर पटकन त्याला आवर घालायची. तरीही मला हे नेहमी आवडत नव्हते. धाकटे भाऊ जसे बहिणींच्या बाबतीत मत्सरी बनतात, तसा मला मत्सर वाटायचा. एखादा तरुण तिच्या आसपास दिसला, तर मी ताबडतोब मधे नाक खुपसायचा. केस पिंजारून मी तिटकाऱ्याने जणू म्हणायचा: "सांभाळ, ती माझ्या भावाची बायको आहे, तिचं रक्षण करायला कुणी नाही अशी समजूत करू नको!"

अशा प्रसंगी मी अतिपरिचयाने संभाषणात तोंड खुपसायचा आणि तिचा अनुनय करणाऱ्यांची कुचेष्टा करायचा. त्यात यश आले नाही तर माझा संयम सुटायचा आणि मुकाट माघार घ्यायचा.

तरुण खो खो हसायचे:

"अरे जरा ह्याच्यावर नजर टाका! ती त्याची जेने असावी! आपल्याला ह्याची कल्पनाच नव्हती!"

मी स्वत:ला आवरायचा प्रयत्न करायचा, पण कान भाजताहेत असे जाणवायचे, दुखावल्यामुळे डोळ्यात पाणी यायचे, पण जामील्या मला समजून घ्यायची. आतून उसळणारे हसू आवरून ती गंभीर चेहरा

करायची आणि जिगितांना तिखटपणे विचारायची:

"जेने अशा वाटेवर पडतात असं तुम्हाला वाटलं काय? कदाचित तुमच्याकडं पडत असतील, पण आमच्याकडं नव्हे! चल माझ्या कायनी, तू लक्ष देऊ नको त्यांच्याकडं!" मग डोक्याला झटका देऊन जामील्या माझ्याबरोबर ऐटीत तेथून सस्मित निघायची.

तिच्या स्मितामध्ये चीड आणि आनंदही दिसत. कदाचित तिला वाटत होते: "अरे वेडपटा! मला आवरायची कोण हिंमत करील? आख्ख्या कुटुंबानं पाळत ठेवली तरी बेहत्तर!" अशा प्रसंगी मी गप्प रहायचा. मला जामील्याचा मत्सर वाटायचा, तिच्यावर माझी भक्ती होती, माझ्या जेनेचा मला अभिमान वाटायचा, तिच्या सौंदर्याबद्दल, स्वतंत्र बेदरकार स्वभावाबद्दल अभिमान वाटायचा. आमचा छान स्नेह होता आणि एकमेकांपासून आम्ही गुपिते राखत नव्हतो.

युद्धकाळात गावात फार कमी पुरुष होते. ह्याचा फायदा घेऊन काही तरुण उर्मट वागत, बायकांशी उद्धट वागत, जणू काही त्यांना म्हणायचे होते: "कशाला त्यांची फिकीर करता, नुसत्या बोटाच्या इशाऱ्यावर मागून धावत येतील!"

एकदा गवतकापणीच्या वेळी आमचा दूरचा नातेवाईक ओस्मोन जामील्याच्या पाठी लागला. आपण बायकांना हवेसे वाटतो असा समज होणाऱ्यांपैकी तो एक होता. जामील्या गवताच्या गंजीच्या सावलीत

विश्रांती घेत होती, तिने त्याचा हात रागाने झिडकारला व ती ताडकन उठली.

"पुरे कर!" वेदनेने ती कळवळली व बाजूला फिरली. "तुमच्याकडून दुसरी अपेक्षा काय करणार, कळपातली शिंगरं आहात!"

ओस्मोन गंजीवर उताणा पडला, ओले ओठ मुरडून म्हणाला:

"उंचावर टांगलेलं मांस मांजरांच्या दृष्टीनं कुजकं असतं... उगीच नखरे काय करतेस? मनातून नुसती उतावळी बनलीस... फुकट नाक मुरडते!"

जामील्या फणकाऱ्याने वळली:

"होय नाक मुरडते! आमचं नशीबच तसं आहे. मूर्खा, तू हसतोस, शंभर वर्षं सैनिकाची बायको राहीन, तुझ्यासारख्यांवर थुंकायची इच्छा नाही–किळस येते तुमची! युद्ध नसतं, तर तुझ्याकडं एका बाईनं ढुंकूनसुद्धा बघितलं नसतं!"

"मी तेच म्हणतो ना, युद्ध! नवऱ्याच्या चाबकाविना तू पिसाळते आहेस!" ओस्मोन खिदळला. "जर माझी बाई असतीस, तर दाखवला असता तुला इंगा, तुझी जीभ एवढी सैल सुटली नसती!"

जामील्या त्याच्यावर झेपावण्याच्या बेतात होती, बोलण्याला आवर घालून गप्प राहिली, त्याच्या नादी न लागणे हे तिच्या ध्यानात आले, ती त्याच्याकडे खूप वेळ तिटकाऱ्याने बघत राहिली. मग जोरात थुंकून दाताळे उचलून ती निघून गेली.

मी गाडीवर गवताच्या गंजीपलिकडे होतो, मला पाहताच ती गर्रकन बाजूला वळली, माझी अवस्था तिच्या ध्यानात आली. तिचा नव्हे माझा अपमान मला वाटला, माझी बेअब्रू झाली असे मला वाटले. निराश होऊन मी तिला बोल लावला:

"कशाला अशा लोकांच्या तोंडी लागतेस? निदान बोलू नये!"

जामील्या त्या दिवशी थेट संध्याकाळपर्यंत उदास वावरत होती. ती माझ्याशी बोलली नाही, नेहमीसारखी हसली नाही. जेव्हा मी तिच्यापाशी गाडी नेली, तिने दाताळे गंजीत खुपसले, गवताचा भारा उचलला व त्याआड चेहरा लपवला, माझ्याशी न बोलण्याचा तिचा तो प्रयत्न होता. अशा रीतीने भाऱ्यामागून भारा गाडीत टाकून ती पटकन परत जात होती. गाडी लौकर भरली. गाडी हाकताना मी मागे वळलो, ती विचारात गढली होती, दाताळयाच्या दांडयाशी रेलून उभी होती, मग दचकून पुन्हा कामाला लागली.

शेवटची गाडी भरल्यानंतर जामील्या सूर्यास्ताकडे खूप वेळ बघत होती, जणू ती सबंध जगाला विसरली होती. नदीपलीकडच्या कझाख स्तेपच्या क्षितिजाशी थकलेला सूर्य पेटत्या उलटया पडलेल्या तान्दीर* सारखा

---

* तान्दीर–पराठे भाजण्यासाठी घराजवळच्या अंगणात खोदलेली भट्टी.

दिसत होता. क्षितिजापलिकडे तो सावकाशपणे बुडत होता, विस्कळीत ढगांना शेंदरी रंगाची डूब देत होता, जांभळया स्तेपवर शेवटची किरणे टाकत होता, आधीच सावलीत आलेल्या दऱ्यांमध्ये निळसर संधिप्रकाश भरत होता. जामील्या मंत्रमुग्धपणे सूर्यास्त पहात होती, जणू ती चमत्कार पहात होती, तिचा चेहरा हळुवार बनला होता, लहान मुलासारखे तिचे विलग ओठ स्निग्ध स्मित करत होते. मग अजूनही माझ्या ओठांवर असलेल्या अकथित ठपक्यांना उत्तर देण्यासाठी ती माझ्याकडे वळली व आमचे संभाषण जणू पुढे चालू आहे, ती म्हणाली:

"किचिने बाला, तू त्याच्याबद्दल विचार करू नको! तो काय माणूस आहे?" जामील्या गप्प झाली, मावळता सूर्य पाहू लागली. मग उसासा टाकून विचारमग्नपणे पुढे म्हणाली: "माणसाच्या काळजात काय आहे हे ओस्मोनसारख्यांना कुठं माहीत असतं? कुणालाही हे माहीत नसतं... कदाचित जगात असे पुरुष नाहीत..."

जोवर मी घोड्यांशी बोलत होतो, तोवर जामील्या दुसऱ्या बायकांपाशी धावली, त्यांचे आनंदी खणखणीत आवाज मला ऐकू येत होते. तिच्यात झालेला बदल समजावून सांगणे अवघड आहे, बहुधा सूर्यास्ताने तिचे मन शांत केले असावे अथवा दिवसभराच्या कामानंतर ती आनंदी बनली. मी गाडीवरच्या गंजीवर बसलो होतो, जामील्याकडे बघत

होतो. तिने डोक्यावरचा रुमाल बाजूला काढला आणि गवत कापलेल्या कुरणावरून मैत्रिणीबरोबर ती धावली, तिचे हात बाजूला पसरले होते, वारा तिच्या फ्रॉकच्या किनारीशी फडफडत होता. अचानक माझी खिन्नता पळून गेली: "ओस्मोनच्या बडबडीबद्दल विचार करण्यासारखे आहे किंवा नाही?"

"चला-रे!" मी चाबूक उडवला व घोड्यांना हाकारले.

त्या दिवशी पथक-प्रमुखाच्या सल्ल्यानुसार मी घरी वडलांची वाट पाहण्याचे ठरविले, डोके भादरायचे होते, दरम्यान सादिकच्या पत्राला उत्तर लिहायचे घेतले. इथे आमचे नियम होते: भाऊ वडलांच्या नावाने पत्रे लिहीत होते, गावातील पोस्टमन त्या पत्रांना आईच्या हाती देत होते, ती पत्रे वाचणे आणि त्यांना उत्तरादाखल पत्रे लिहिणे ही माझी जबाबदारी होती. पत्र न वाचताच सादिकने काय लिहिले हे मला आधीच ठाऊक असायचे. आमच्या मेंढ्यांच्या कळपातील सर्व कोकरांप्रमाणे त्याची सर्व पत्रे एकसारखी होती. सादिकच्या पत्रांचा आरंभ नमस्कारांनी व्हायचा, नंतर तो लिहायचा: "मधुर वासाच्या, फुलणाऱ्या तालास भूमीत राहणाऱ्या माझ्या नातेवाईकांना मी टपालामार्फत हे पत्र पाठवत आहे: आदरणीय माझे प्रिय पिताजी जोलचूबाय यांना..." पुढे माझी आई, नंतर त्याची आई व काटेकोरपणे ओळीने आमचा

उल्लेख असे. प्रकृतीबद्दल अटळ प्रश्न यायचा, आमच्या टोळीतील अकसाकालांच्या* कल्याणाबाबत प्रश्न यायचे, जवळच्या नातेवाईकांबद्दल विचारणा व्हायची. मग जणू घाईने सादिक लिहायचा: "माझी बायको जामील्या हिला रामराम."

अर्थात आई-बाप जिवंत असताना, अकसाकालांनी व जवळच्या नातेवाईकांनी सारे गाव भरले असताना बायकोचा उल्लेख करणे अयोग्य ठरायचे, मग तिच्या नावाने पत्र लिहिणे दूरच होते. केवळ सादिकचेच नव्हे, तर प्रत्येक प्रतिष्ठिताचे असे मत होते. ह्या प्रस्थापित रिवाजाला कुणी विरोध केला नव्हता, त्याबद्दल चर्चा करणे दूरच होते, त्याच्या योग्ययोग्यतेविषयी आम्ही कधी विचारच केला नव्हता. सरतेशेवटी, प्रत्येक पत्र म्हणजे प्रदीर्घ काळ वाट पाहिलेली सुखी घटना असायची.

माझी आई माझ्याकडून पत्र अनेक वेळा वाचवून घ्यायची. मग कष्टांनी राठ बनलेल्या हातांनी ते पत्र भक्तिभावाने घ्यायची, जणू पक्षी उडायला सज्ज झालाय अशा रीतीने ती ते पत्र वेडेवाकडे धरायची, शेवटी पत्राची त्रिकोणी घडी घालायची.

"माझ्या लाडक्यांनो, तुमची पत्रं ताईत म्हणून जपून राखू!" कापऱ्या रडव्या स्वरात ती म्हणायची. "आमच्या प्रकृतींची चौकशी करतोय... आम्ही तर

* अक्साकाल – आदरणीय वयोवृद्ध.

गावातच राहतो. तुम्ही कसे आहात? निदान जिवंत आहोत असं एका शब्दानं कळवा, म्हणजे पुरे झालं – त्यापेक्षा आम्हाला आणखी काही नको..."

आई त्रिकोणी पत्रावर खूप वेळ पहायची, मग छोट्या कातडी बटव्यात लपवायची, तो बटवा कुलूप घातलेल्या ट्रंकेत ठेवायची.

जर ह्यावेळी जामील्या घरात असायची, तर तिला पत्र वाचायला देण्यात येई. दर वेळी जेव्हा ती हातात पत्र घ्यायची, तेव्हा ती लाल बनायची असे माझ्या ध्यानात यायचे. ओळींवरून डोळे भराभरा फिरवत ती आधाशीपणे स्वतःशी वाचायची. पत्राच्या शेवटपर्यंत जायची, तेव्हा तिचे खांदे खाली उतरत जायचे व गालांवरची लाली हळूहळू कमी होत जायची. स्वतःच्या हट्टी भुवया ती आकुंचित करायची आणि शेवटची ओळ न वाचता निर्विकारपणे आईला पत्र द्यायची, जणू कर्ज परत केल्याप्रमाणे!

माझी आई सुनेला समजून घ्यायची, ती तिला प्रोत्साहन द्यायची:

"काय झालं तुला?" ट्रंक बंद करत ती म्हणायची. "आनंदी होण्याऐवजी एवढी उदास का झालीस? तुझ्या एकटीचाच नवरा सैनिक आहे? तू एकटी संकटात नाहीस, सारा देश संकटात आहे, इतरांबरोबर सहन कर. दुसऱ्या मुलींना एकटं वाटत नाही. त्यांना नवऱ्यांची आठवण नाही, अशी तुझी

समजूत आहे? खुशाल दुःखानं झुरत रहा, पण दुसऱ्यांना दाखवू नको, दुःख लपवून ठेव!"

जामील्या गप्प रहायची. पण तिची हट्टी उदास नजर जणू म्हणायची: "आईसाहेब, तुम्हाला काहीही कळत नाही!"

सादिकचे पत्र ह्यावेळी सारातोवहून आले होते. तो तेथे इस्पितळात पडला होता. सादिकने लिहिले होते, अल्लाच्या कृपेने तो शरदाच्या दरम्यान घरी येईल. लौकरच त्याची भेट होईल म्हणून आम्ही सर्व आनंदलो.

तरीही त्या दिवशी मी घरात थांबलो नाही, शेवटी झोडपणीच्या खळ्यावर गेलो, तेथे मी नेहमी रात्री झोपायचा. घोडेघास गवताच्या कुरणात मी घोड्यांना सोडले व त्यांच्या पायांना दांडकी बांधली. घोडेघासात जनावरांना सोडायला सामुदायिक शेताचा अध्यक्ष आम्हाला मनाई करायचा. माझे घोडे खाऊन पुष्ट व्हावेत अशा हेतूने मी तो नियम मोडला. खालच्या बाजूला एक जागा मला ठाऊक होती, रात्रीच्या वेळी तिकडे कुणाचेही लक्ष जात नसे, पण ह्यावेळी मी घोड्यांना तेथे घेऊन गेलो, तर कुणीतरी चार घोडे घोडेघासात सोडले होते असे मी पाहिले. मी चिडलो. कारण दोन घोड्यांच्या गाडीचा मी मालक होतो. परक्याचे घोडे तात्काळ हाकून लावण्याचा माझा इरादा होता. माझ्या कुरणात आक्रमण करणाऱ्याला चांगली अद्दल घडवायची माझी

इच्छा होती. पण एकदम माझ्या ध्यानात आले की, ते घोडे दानीयारचे होते. त्याच दिवशी त्याच्याबद्दल पथक-प्रमुख माझ्याशी बोलला होता. दुसऱ्या दिवसापासून तो आणि मी एकत्र काम करणार होतो, तेव्हा घोड्यांचा नाद सोडून मी झोडपणीच्या खळ्यावर परतलो.

दानीयार तेथे होता. त्याने स्वतःच्या गाडीच्या चाकांना वंगण लावायचे काम नुकतेच संपवले होते आणि आत्ता बोल्ट पिळत होता.

"दानीयार, खालच्या बाजूला तुझे घोडे आहेत?" मी विचारले.

दानीयारने सावकाशपणे डोके वळविले.

"दोन माझे."

"दुसरी जोडी कुणाची?"

"ती, काय नाव तिचं, जामील्याची, तिचे ते घोडे आहेत. ती तुझी कोण आहे? तुझी जेने?"

"होय जेने."

"पथक-प्रमुखानं स्वतःच घोडे तिथं ठेवले, त्यांच्यावर लक्ष ठेवायचा मला हुकूम दिला."

घोड्यांना मी हाकलले नव्हते हे किती छान!

रात्र झाली, डोंगरावरून वाहणारा संध्याकाळचा वारा शांत झाला. झोडपणीच्या खळ्यावर सारे शांत बनले. दानीयार माझ्याशेजारी कडब्याखाली पडला होता, पण लौकरच तो उठला व नदीकडे चालत गेला. कड्याच्या टोकाशी तो उभा राहिला,

माझ्याकडे पाठ करून हात मागे धरून डोके एका बाजूला कलते करून तो उभा होता. मंद चांदण्याच्या प्रकाशात त्याची सडपातळ आकृती उठून दिसत होती, जणू कोरीव पुतळ्यासारखा तो भासत होता. पाण्याचे आवाज तो जणू ऐकत होता, रात्रीच्या वेळी ते आवाज स्पष्ट ऐकू येत होते. कदाचित जे आवाज आणि कुजबुजते ध्वनी मी ऐकू शकत नव्हतो, त्यांना तो ऐकत होता. "बहुधा पुन्हा तीरावर रात्र घालवण्याचा इरादा असावा!" असा मनाशी विचार करून मी हसलो.

दानीयार आमच्या गावात नवागत होता. एके दिवशी एक मुलगा शेतात धावत ओरडत आला की, खेड्यात जखमी सैनिक आला होता, त्या सैनिकाला तो जाणत नव्हता, त्याचा ठावठिकाणा त्याला माहीत नव्हता. नंतर खूप गडबड माजली! जेव्हा कुणीतरी युद्धआघाडीवरून परत यायचा, तेव्हा त्याच्याशी हस्तांदोलन करायला प्रत्येकजण धावायचा, त्याचे नावगाव विचारायचा आणि स्वतःच्या नातेवाईकांची विचारपूस करायचा, नवी बातमी आतुरतेने ऐकायचा. अशा वेळी आरडाओरडीचे वर्णन करणे अशक्य. प्रत्येकाच्या मनात विचार यायचा: "कदाचित आमचा भाऊ परतलाय किंवा मेहुणा?" माणूस कोण आहे हे पाहण्यासाठी कापणी करणारे गावाकडे पळायचे.

आम्हाला कळले होते की, दानीयार खरोखरच आमच्या गावचा होता. बालपणी तो पोरका बनला.

सुमारे तीन वर्षेपर्यंत त्याची घरोघर पाठवणी होत होती, शेवटी चाकमाक स्तेपमध्ये कझाखांकडे रहायला गेला होता. त्याच्या आईच्या बाजूने नातेवाईक कझाख होते. मुलाला आमच्या गावात कुणीही नातेवाईक नव्हते, लौकरच सर्वांना त्याचा विसर पडला. गाव सोडल्यानंतर तो कसा जगला होता अशी लोकांनी त्याच्यापाशी विचारणा केली, पण त्याने उडवाउडवीची उत्तरे दिली. अर्थात त्याने दुःख भोगले होते आणि पोरक्याचे खडतर नशीब अनुभवले होते हे स्पष्ट होते. आयुष्याने त्याला गडगडत्या दगडासारखे ढकलले होते. दीर्घ काळपर्यंत त्याने चाकमाकच्या खार दलदलीत मेंढरे राखलीत; मोठेपणी त्याने वाळवंटात कालवा खणण्याचे काम केले, कापसाच्या नव्या सरकारी शेतांवर तो काम करत होता. ताश्कंदजवळ आन्ग्रेनातील खाणींमध्ये होता, तेथून त्याला लष्करात बोलावणे आले होते.

दानीयारचे गावात परतणे लोकांना आवडले होते. ते म्हणत होते: "कितीही भटकून शेवटी परतलाय, मूळ गावाचे पाणी पिणं त्याच्या नशीबी आहे. स्वतःची भाषा नाही विसरलाय, काही वेळा कझाख शब्द वापरतो तरी बोलतो चांगलं."

"तूल्पार* जगाच्या टोकाशी असला तरी स्वतःच्या कळपाला शोधील! माणसाची मायभूमी

*तूल्पार – दंतकथेतील घोडा.

आणि त्याची माणसे नेहमी त्याला जिवलग वाटतात, त्याने परतणे चांगले असते. आम्ही खूष झालो, आमच्या पूर्वजांचे आत्मे खूष झालेत. अल्लाच्या मदतीनं आम्ही जर्मनांचा फडशा पाडू आणि पुन्हा शांततेत जगू, प्रत्येकाप्रमाणं तुला कुटुंब मिळेल, तुझ्या चुलीमधून धूर निघेल!" म्हातारे आक्साकाल त्याला म्हणत.

दानीयारच्या पूर्वजांची लोकांनी नेमकी आठवण काढली. म्हणून तो कोणत्या कुळातील होता हे त्यांनी शोधले. अशा रीतीने आमच्या गावात आम्हाला नवा "नातेवाईक" सापडला – दानीयार.

ह्या उंच, उतरत्या खांद्यांच्या, लंगडणाऱ्या सैनिकाला ओरोझमातने शेतात आणले. खांद्यावर ओव्हरकोट टाकून दानीयार भरभर चालत होता, ओरोझमातच्या घोड्याला गाठायचा त्याचा प्रयत्न होता. उंच दानीयारशेजारी आमचा बुटका पथक-प्रमुख नदीवरच्या तुडतुड्या पाखरासारखा भासत होता. त्या दोघांना एकत्र पाहून पोरे हसत होती.

दानीयारची जखम अजून बरी झाली नव्हती व त्याचा पाय अद्याप ताठ होता; ह्याचा अर्थ तो गवतकापणी करू शकत नव्हता. गवतकापणीच्या यंत्रांची देखरेख करायला त्याची आम्हा पोरांबरोबर नेमणूक झाली होती. खरे तर आम्हाला तो आवडला नव्हता. सर्वप्रथम त्याचे कायम मौन आम्हाला आवडत नव्हते. दानीयार अगदी कमी बोलायचा. जेव्हा

बोलायचा तेव्हा त्याच्या डोक्यात दुसराच विचार खेळत होता असे भासायचे. त्याच्या विचारमग्न, स्वप्नाळू डोळ्यांनी जरी तो तुमच्याकडे पाही, तरी त्याने तुम्हाला पाहिले अशी तुमची खात्री नसायची.

"बिचारा, युद्धानंतर अजून थाऱ्यावर परत येत नाही!" लोक म्हणायचे.

आश्चर्य म्हणजे अशा विचारमग्न अवस्थेत असूनही दानीयार काम लौकर आटपायचा आणि कुशलतेने काम करायचा, पहिल्याच दृष्टिक्षेपात तो कामसू आणि मोकळा माणूस भासायचा. असुखी बालपणामुळे तो स्वतःचे विचार अथवा स्वतःच्या भावना लपवायला शिकला असावा, त्यामुळे तसा तो अलिप्त बनला होता.

दानीयारच्या पातळ ओठांना तोंडाच्या कोपऱ्याशी ठळक रेषा होत्या, त्याचे ओठ नेहमी घट्ट मिटलेले असायचे, त्याचे डोळे खिन्न व गंभीर दिसायचे. फक्त त्याच्या पटकन कमानदार होणाऱ्या भुवयांमुळे त्याच्या थकलेल्या चेहऱ्याला जिवंतपणा यायचा. काही वेळा तो अचानक सावध व्हायचा, जणू आम्हाला ऐकू न येणारे ऐकायचा, मग त्याच्या भुवया वरती उडायच्या आणि डोळ्यांमध्ये विचित्र चमक उमटायची. आनंदाचे स्मित त्याच्या चेहऱ्यावर खूप वेळपर्यंत रेंगाळायचे. आम्हाला हे विचित्र वाटायचे. त्याच्यातील दुसरीही वैशिष्टचे

होती. संध्याकाळी आम्ही घोडे सोडायचे व तंबूभोवती जमायचे, जेवणासाठी आचाऱ्याची वाट पहायचे, पण दानीयार टेहळणीच्या टेकडीवर* चढायचा. तेथे अंधार पडेपर्यंत थांबायचा.

"तो तिथं काय करतोय, पहारा करतोय कशावर तरी?" आम्ही हसत असू.

एकदा कुतूहल शमविण्यासाठी मी त्याच्या पाठोपाठ टेकडीवर गेलो. तेथे विशेष काही नव्हते. संधिप्रकाशातील जांभळे स्तेप दूर क्षितिजावर डोंगराच्या ओळीपर्यंत पसरले होते. काळपट, धूसर मैदाने स्तब्धतेत विरघळून जात असल्याचे भासत होते.

दानियार माझ्याकडे लक्ष देत नव्हता. गुडघ्यांना मिठी घालून दूरवर टक लावून विचारात गढला होता. मला पुन्हा भासले की, मला ऐकू न येणारे आवाज तो एकतानतेने ऐकत होता. अधूनमधून तो दचकत होता आणि थिजत होता, त्याचे डोळे सताड विस्फारत. त्याला काहीतरी डाचत होते आणि आता तो उठेल, मन मोकळे करील, काहीतरी प्रचंड, अनाकलनीय, मला न दिसणाऱ्या गोष्टीपुढे तो मन मोकळे करील, असे मला वाटत होते पण त्याने माझी दखलसुद्धा घेतली नाही. मग मी त्याच्याकडे नजर

---

* टेहळणी टेकडी – किर्घिझियात भटक्या टोळ्यांच्या काळातील हा शब्दप्रयोग अजूनही वापरतात.

टाकली आणि त्याला मी ओळखलेच नाही: जणू दिवसभराच्या कामानंतर विश्रांती घ्यावी असा दानीयार साधा व खिन्न बसला होता.

आमच्या सामुदायिक शेताची गवताची मैदाने कुरकूरेऊ नदीच्या पाणलोटाखालच्या जमिनीवर पसरली आहेत. आमच्या गावाजवळ नदी एका खिंडीतून निसटते. तेथून ती जोरात बेलगाम खळाळत धावते, तिचा प्रचंड ओघ पडतो. डोंगरी नद्यांना पूर येतो तेव्हा गवतकापणीचा हंगाम असतो. चिखलभरले फेसाळणारे पाणी संध्याकाळच्या वेळांना वर चढू लागते. मध्यरात्री नदीचे उसासे ऐकून मी तंबूत जागा व्हायचा आणि नीरव रात्रीतील आकाशातील तारे पहायचा; वाऱ्याचे थंड व अचानक झोत येत असत. धरती झोपलेली असायची आणि उसळती नदी आमच्या दिशेने भयानकपणे पुढे घुसायची. आम्ही जरी किनाऱ्यापासून फार जवळ नसलो, तरी पाण्याची जवळीक मला स्पष्ट जाणवायची, तंबू कोसळून वाहात जाईल अशी मला एक अनामिक भीती घेरायची. माझे साथी गवतकाप्यांची गाढ झोप झोपायचे, पण मी अस्वस्थ व्हायचा व बाहेर जायचा.

कुरकूरेऊच्या पाणलोटाच्या जमिनीवर रात्र सुंदर आणि धडकी भरविणारीही असते. पायांमध्ये दांडके घातलेल्या घोड्यांच्या काळपट आकृती कुरणात विखुरलेल्या दिसत. दवमाखले गवत पोटभर खाऊन ते आता थकून झोपी जात, मंदपणे फुरफुरत. त्यांच्या

पाठी किनाऱ्यावर खळखळत जाणारी व वळणावर वाकलेल्या वाळुंजीच्या फांद्यांना तडाखे देणारी कुरकूरेऊ नदी गोटयांना गडगडत नेताना पोकळ आवाज करायची. अस्वस्थ नदी रात्री भयानक, रक्त गोठवणारे आवाज करायची.

अशा रात्रींना मला नेहमी दानीयारची आठवण व्हायची. पाण्याच्या कडेशी गवताच्या गंजीवर तो सहसा झोपायचा. त्याला भीती नाही वाटायची? नदीच्या आवाजामुळे त्याचे कान बधीर होत नसत? तेथे तो खरेच झोपू शकायचा? नदीतीरावर तो एकटा रात्री का घालवायचा? कोणती शक्ती त्याला तेथे खेचून न्यायची? तो विचित्र माणूस होता, दुसऱ्या जगातील माणूस होता. आता तो कुठे आहे? मी भोवती पाहिले, पण कुणीही दिसले नाही. दूरवर उतरत्या टेकडयांप्रमाणे नदीतीर मागे सरकले होते आणि अंधारात डोंगरांची ओळ अंधुक दिसत होती. तेथे शिखरांवर सर्व काही शांत होते.

दानीयारला गावात एव्हाना मित्र जमवायचे होते. पण पूर्वीप्रमाणेच तो एकटा होता, जणू मैत्री अथवा वैर, सहानुभूती अथवा मत्सर ह्या शब्दांचे अर्थ त्याला ठाऊक नव्हते. स्वत:साठी आणि मित्रांसाठी जो कुणी वेळप्रसंगी उभा राहील, भले किंवा वाईटही करू शकेल, आक्साकालांच्या समोर माघार घेणार नाही, समारंभप्रसंगी हाती सूत्रे घेईल, अशा जिगिताचा सर्व गौरव करतात व बायकांच्या नजरांमध्ये तो भरतो.

पण सदैव अलिप्त राहणारा व गावातील घडामोडीमध्ये भाग न घेणारा दानीयारसारखा माणूस असेल, तर लोक त्याच्याकडे दुर्लक्ष करतात आणि म्हणतात :

"तो ना भलं आणि ना वाईट करतो. बिचारा निरुपयोगी आहे, जगू दे त्याला निवांत..."

सर्वसाधारणपणे असा माणूस सर्व विनोदांचे अथवा करुणेचे उद्दिष्ट बनतो. वयस्क दिसण्याचा प्रयत्न करणारे आणि अस्सल जिगिताशी बरोबरी असू इच्छिणारे आम्ही तरुण नेहमी त्याच्या पाठीशी हसत असू. त्याच्या तोंडावर तसे करण्याची आमची हिंमत नव्हती. तो नदीवर स्वत:चा लष्करी सदरा धुवायचा म्हणून आम्ही हसत होतो. तो सदरा धुवायचा व ओलसर घालायचा, कारण त्याला दुसरा सदरा नव्हता.

दानीयार जरी सौम्य आणि अलिप्त दिसायचा तरी आश्चर्य म्हणजे त्याच्याशी फाजील सलगी दाखवायची आमची हिंमत नव्हती, आमच्यापेक्षा तो फार तर तीन-चार वर्षांनी वडील होता म्हणून नव्हे, तशा परिस्थितीत आम्ही त्याला एकेरी नावाने हाक मारली असती. तो कठोर दिसायचा अथवा अहंकारी भासायचा म्हणून नव्हे, पण त्याच्या गप्प राहण्यामुळे, उदास विचारमग्नतेमुळे आम्ही त्याच्यापासून बिचकून दूर रहात असू, एरवी अशा माणसाची आम्ही मनसोक्त टर उडवली असती.

मला वाटते की, आम्ही त्याच्यापासून अलिप्त बनायला एक प्रसंग जबाबदार होता. मी चौकस मुलगा होतो व माझ्या प्रश्नांनी लोकांना सतत भंडावून सोडायचा. सैन्यातून बाहेर पडलेल्या सैनिकांना युद्धाबद्दल प्रश्न विचारण्याचा मला फार नाद होता. जेव्हा दानीयार कामासाठी आला, तेव्हा माजी सैनिकाकडून माहिती काढण्यासाठी मी आटोकाट प्रयत्न केले.

एके संध्याकाळी कामानंतर आम्ही शेकोटीभोवती बसलो होतो, जेवणानंतर विश्रांती घेत होतो.

"दानीयार, अजून झोपलो नाही, तोवर युद्धाबद्दल काहीतरी सांग," मी म्हणालो.

प्रथम तो काहीही बोलला नाही आणि अपमानीत झाल्यासारखा भासला. आगीत खूप वेळ टक लावून बघत राहिला, शेवटी त्याने डोके वर उचलले आणि आमच्याकडे पाहिले.

"युद्धाबद्दल?" त्याने विचारले. जणू स्वतःच्या विचारांना उत्तर देत तो अस्पष्ट पुढे म्हणाला: "नाही, युद्धाबद्दल माहीत नसणं जास्त चांगलं!"

तो बाजूला वळला, त्याने सुकलेली पाने मूठभर उचलली, आगीत फेकली व आमच्याकडे न पाहता आगीवर फुंकरा मारत राहिला.

दानीयार आणखी काही बोलला नाही, पण त्याने बोललेल्या अवघ्या शब्दांवरून आम्हाला जाणवले होते की, युद्ध म्हणजे बोलण्यासारखी आणि झोपेच्या वेळी

ऐकण्यासारखी गोष्ट नव्हते. युद्धाने माणसाच्या काळजात रक्ताची मोठी गाठ साकळवली होती, त्याला युद्धाबद्दल बोलणे सोपे जात नव्हते. मला स्वतःची लाज वाटली आणि पुन्हा कधी मी त्याला युद्धाबद्दल विचारले नाही.

आम्ही त्याचा आदर करू लागलो ह्याचे मात्र हे कारण नव्हते. ती संध्याकाळ आम्ही पटकन विसरलो, दानीयारबद्दल गावाला तेवढे पटकन स्वारस्य संपले. त्याचा अलिप्तपणा त्याच्याबद्दल केवळ परकेपणा व करुणा निर्माण करायचा.

"तो दुर्दैवी, घर नसलेला मुलगा आहे. निदान सामुदायिक शेतावर त्याला अन्न मिळते. गरीब कोकरासारखा तो शांत आहे!" गावकरी म्हणायचे.

त्याच्या विचित्र वर्तनाची गावकऱ्यांना लौकरच सवय झाली आणि पुढे पुढे त्याच्याबद्दल आपापसात चर्चा करणे त्यांनी बंद केले. असे घडणे स्वाभाविक होते: जर माणूस स्वतःला सिद्ध करत नसतो, तर लोक त्याला लौकरच विसरतात.

दुसऱ्या दिवशी सकाळी मी व दानीयारने झोडपणीच्या खळ्यावर घोडे आणले. जामील्या आधी आली होती. दुरून आम्हाला न्याहाळून ती ओरडली:

"ए किचिने बाला, माझ्या घोड्यांना आण! माझी जोखडं कुठं आहेत?" मग अस्सल गाडीवानाप्रमाणे गाडीची पाहणी ती करू लागली, चाकांना लाथा मारू लागली.

जेव्हा मी व दानीयार आलो, तेव्हा आमचे अवतार तिला मजेदार वाटले. दानीयारचे लांब, हडकुळे पाय प्रचंड रुंद ताडपत्रीच्या बुटांमध्ये लोंबत होते, बूट कोणत्याही क्षणी खाली निसटणार असे भासत होते, मी माझ्या घाणेरड्या अनवाणी पायांनी घोड्यांच्या कुशीत ढोसत होतो.

"काय पण जोडी तुमची!" डोक्याला झटका देत ती मजेने म्हणाली. दुसऱ्याच क्षणी ती हुकूम ओरडू लागली: "लौकर! ऊन चढण्यापूर्वी स्तेप ओलांडायचं आहे!"

तिने काढण्या भक्कम धरल्या, घोड्यांना गाडीकडे नेले व त्यांना ती जुंपू लागली. लगाम कसे बसवावेत असे एकदाच तिने मला विचारले होते. दानीयार जणू तेथे नव्हताच अशी तिने त्याची दखल घेतली नव्हती.

तिच्या ठामपणाला, आत्मविश्वासाला पाहून दानीयार चकित झाला होता. ओठ घट्ट मिटून तो नाराज मुद्रेने उभा राहिला. तरीही त्याने कौतुकाचा भाव लपवला होता. वजनाच्या काट्यावरून त्याने धान्याचे पोते उचलले व मुकाटपणे गाडीकडे आणले, तेव्हा जामील्या त्याच्यावर ओरडू लागली:

"काय हे प्रत्येकजण आपल्यापुरतं काम करील? नाही मित्रा, असं चालणार नाही, दे पाहू तुझा हात इकडं! ए किचिने बाला, बघतोस काय, चढ गाडीत, पोती लाव!"

जामील्याने दानीयारचा हात स्वतः पकडला आणि

जेव्हा हात वाकवून त्यांनी एकत्रपणे पोते वर उचलले, तेव्हा बिचारा लाजेने चूर झाला. मग प्रत्येकवेळी पोते वाहून नेताना, एकमेकांची मनगटे घट्ट पकडताना त्यांची डोकी एकमेकांना स्पर्शत होती, तेव्हा तो खूप अवघडलेला दिसत होता असे मी पाहिले, त्याने घाबरटपणे ओठ घट्ट चावला होता व तो जामील्याची नजर टाळत होता. पण तिला त्याची पर्वा नव्हती, स्वतःच्या मदतनीसाची ती दखल घेत नव्हती, वजनाच्या काटयावरच्या बाईशी ती थट्टा-विनोद करत होती. जेव्हा गाडया पोत्यांनी भरल्या, तेव्हा आम्ही लगाम उचलले. लबाडपणे डोळा मारून जामील्या हसून म्हणाली:

"ए काय रे तुझं नाव? दानीयार? तू तर पुरुष दिसतोस, तर पहिल्यांदा वाटेवर गाडी ने!"

दानीयारने पुन्हा मुकाटपणे गाडी हाकारली. "बिचाऱ्या अजून कसा तू लाजरा!" माझ्या मनात विचार आला.

आमचा प्रवास लांबचा होता: स्तेपमधून वीस किलोमीटर, मग खिंडीतून स्टेशनापर्यंत. सबंध रस्ता उताराचा होता ही एकमेव चांगली बाब होती – घोडयांच्या दृष्टीने रस्ता सोपा होता. आमचे गाव कुरकूरेऊ नदीच्या तीरालगत वसले होते, पर्वतउतारावर होते, काळया पर्वतापासून पसरले होते. खिंडीतल्या रस्त्यावरून गावातील झाडांचे काळसर शेंडे दिसू लागत.

आम्ही दिवसा फक्त एक खेप टाकत होतो. भल्या सकाळी निघून दुपारी स्टेशनावर पोहोचत होतो.

सूर्य निर्दयपणे तळपत होता, स्टेशनवर खूप गर्दी होती, वाट काढणे अवघड होते: पोत्यांचे ढीग रचलेल्या गाड्या तेथे होत्या, दूरच्या डोंगरातील सामुदायिक शेतांमधून खेचरे व बैल ओझी घेऊन आले होते. पोरे आणि सैनिकांच्या बायका गाड्या हाकत आली होती. उन्हात त्यांचे चेहरे करपून गेले होते, त्यांचे कपडे विटके बनले होते, खडकाळ रस्त्यांमुळे त्यांच्या पावलांना फोड आले होते, उन्हामुळे व धुळीमुळे त्यांचे ओठ तडकले व रक्ताळले होते.

धान्याच्या एलेव्हेटरपाशी एक घोषणा होती: "युद्धआघाडीसाठी प्रत्येक कणीस!" आवारातील गोंधळ, धक्काबुक्की, गाडीवानांच्या आरोळ्या अवर्णनीय होते. भिंतीपलिकडे आगगाडीचे वाफेचे इंजिन शिट्या मारत शंटिंग करत होते, वाफेचे लोट उडवत होते, जळक्या राखेचा वास येत होता. जवळून आगगाड्या गडगडत जात होत्या. जमिनीवरून उठण्यास नाराज झालेले उंट ओरडत होते, लाळेने भरलेले जबडे रागाने उघडत होते.

स्टेशनच्या तापलेल्या पत्र्याच्या छपराखाली धान्याचे डोंगर साचत होते. छपराखालच्या उतरत्या लाकडी फळ्यांवरून पोती वाहून न्यावी लागत होती. वातावरणात धान्याचा वास दरवळला होता आणि धुळीमुळे श्वास घुसमटत होता.

"ए पोरा, माझ्याकडं पहा!" जागरण झालेल्या डोळयांचा धान्य घेणारा एजंट खालून ओरडला. "वरती ओढ, अगदी वरपर्यंत!" मुठी धमकावत तो शिव्या घालू लागला.

का तो शिव्या घालत होता? पोती कुठपर्यंत न्यायची हे आम्हाला माहीत होते, थेट शेतातून धान्य वाहून आणतोय. त्या शेतांमध्ये लहान-थोर खपले होते, आता कापणीचा हंगाम ऐन जोरात होता, कंबाईन चालक जुन्या यंत्राशी खुडबुडत होता, यंत्र एव्हाना निरुपयोगी बनले होते, तळपत्या कोयत्या अडकवलेल्या बायकांच्या पाठी सदैव वाकल्या होत्या, मुले खाली पडलेल्या प्रत्येक कणसाला काळजीपूर्वक उचलत होती.

पोती किती जड होती हे मला अजूनही आठवते. ते बळकट माणसाचे काम होते. करकरणाऱ्या, खाली वाकणाऱ्या फळयांवरून मी चालत होतो, पोत्याचे टोक दातांमध्ये घट्ट धरून मी ते वाहून नेत होतो. धुळीमुळे माझा घसा खवखवत होता, वजनापायी माझ्या बरगड्या दुखत होत्या आणि डोळयांपुढे आगीची वर्तुळे नाचत होती. अनेक वेळा मला चक्कर यायची, पोते सारखे पाठीवरून घसरायचे, पोते गडगडत सोडून द्यावे कधी कधी मला वाटायचे, पण मागून इतर माणसे येत होती. माझ्याच वयाची ती मुले होती अथवा सैनिकांच्या बायका होत्या. जर युद्ध नसते तर अशी ओझी वाहायची त्यांना कुणी परवानगी दिली

असती? नाही, मला माघार घ्यायचा हक्क नव्हता, माझ्यासारखेच काम बायका करत होत्या.

जामील्या माझ्या पुढे होती, तिने स्कर्ट गुडघ्यांवरती खेचला होता, ताणामुळे तट्ट फुगलेल्या तिच्या रापलेल्या सुरेख पोटऱ्या मला दिसत होत्या. पोत्याच्या वजनाखाली स्वत:च्या सडपातळ देहाचा तोल सांभाळणे तिला फार कष्ट होत होते. काही वेळा ती एक सेकंदभर थबकायची, पुढच्या प्रत्येक पावलाबरोबर मी जास्त दुबळा बनत चालल्याची तिला जणू जाणीव होत होती.

"दम धर, किचिने बाला, आता थोडं उरलंय!"

तिचा आवाज पोकळ आणि निर्जीव वाटत होता.

आमची पोती रिकामी केल्यानंतर परत येताना दानीयार वर येत असलेला आम्हाला दिसायचा. दणकट, मोजक्या पावलांनी फळ्यांवर चालताना तो किंचित लंगडत होता. आम्ही त्याच्या पुढे जाताच, दानीयार जामील्याकडे रागीट जळता कटाक्ष टाकायचा. ती दमलेली पाठ ताठ करायची आणि चुरगळलेला पोषाख खाली खेचायची. जणू तो तिला प्रथमच पहात होता असे प्रत्येक वेळी बघायचा, पण जामील्या त्याच्याकडे दुर्लक्षच करायची.

तो एक प्रकारचा ठरलेला साचा बनला: मन:स्थितीनुसार जामील्या हसायची किंवा पूर्णपणे दुर्लक्षायची. एकदा घोड्यांवरून येत होतो, एकदम ओरडून मला म्हणाली: "चल! जोरात

पळव!" तिने डोक्यावर चाबूक फडकावला व घोड्यांना पळवले. मी तिच्या पाठोपाठ दौडलो. आम्ही दानीयारला धुळीच्या लोटांमध्ये मागे टाकले. हे जरी गंमतीने केले असले, तरी फारच कमी पुरुषांना सहन झाले असते. पण दानीयारला विशेष वाटले नाही. आम्ही तुफान दौडत जात असताना तो कौतुकास्पद हसऱ्या चेहऱ्याने जामील्याकडे बघायचा, गाडीत ताठ उभा रहायचा. दानीयार धुळीतून तिच्याकडे नजर टाकायचा. त्याच्या नजरेत प्रेमळ आणि पूर्ण क्षमा करणारा भाव दिसायचा, त्या नजरेत हट्टीपणा व सुप्त खिन्नता दिसायची.

ती त्याची थट्टा करायची अथवा त्याला दुर्लक्षायची, ह्याचा त्याला मुळीच राग येत नसे. जणू ते सहन करण्याची त्याने शपथ घेतली होती. प्रथम मला त्याच्याबद्दल वाईट वाटायचे व जामील्याची मी कानउघाडणी करायचा:

"जेने त्याची थट्टा का करतेस? तो किती शांत आणि गरीब आहे!"

"मी कुठं काय करते!" खांदे उडवून ती हसायची. "मी फक्त गंमत करतेय, त्याला काहीही व्हायचं नाही!"

लौकरच मीही त्याची थट्टा करू लागलो. त्याच्या विचित्र, आग्रही नजरांमुळे मी चिंतित व्हायचा. ती पाठीवर पोते उचलायची तेव्हा तो कसा टक लावायचा! गोंधळात, धक्काबुक्कीत, स्टेशनवरच्या

बाजारी गोंगाटात ओरडून व मागे-पुढे धावपळ करून लोकांचे आवाज घोगरे बनत, जामील्याच्या आत्मविश्वासू, मोजक्या हालचाली व हलकी पावले लोकांचे लक्ष वेधून घेत, त्या वातावरणाच्या चौकटीत जणू ती बसत नव्हती.

न थांबणे आणि तिच्याकडे न पाहणे अवघड होते. गाडीच्या टोकावरून पोते घेत असताना जामील्या मागे वळून शरीर ताणायची, खांदा पुढे करून सुंदर मान उघडी दिसेल अशा बेताने डोक्याला मागे झटका द्यायची, उन्हात तांबूस बनलेल्या तिच्या वेण्या जमिनीला जवळजवळ स्पर्श करायच्या. दानीयार विश्रांतीसाठी थांबायचा, पण त्याचे डोळे थेट दारापर्यंत तिचा पाठलाग करायचे. कुणीही त्याच्याकडे पहात नाही अशी त्याची खात्री होती, पण मी सर्व पहात होतो, मला ते आवडत नव्हते, मला अपमान वाटायचा: दानीयार जामील्याला लायक नव्हता असे माझे मत होते.

तो तिच्याकडे टक लावायचा हे मला आवडायचे नाही, मग इतरांनी तिच्याकडे पाहिले तर मी मनाशी धुमसायचा. माझ्यातील अद्याप नाहीसा न झालेला बालिश अहंभाव भयानक मत्सरात रूपांतरित व्हायचा. आपल्या आवडत्या माणसांनी बाहेरच्या लोकांकडे लक्ष दिले तर मुलांना राग येतो. आता दानीयारबद्दल सहानुभूतीऐवजी मला अप्रियता वाटू लागली, कुणीतरी त्याची थट्टा केली म्हणजे मला आनंद व्हायचा.

पण आमच्या थट्टा एकदा दुर्दैवाने संपल्या. धान्याच्या पोत्यांमध्ये जाडयाभरडया लोकरीचे सात पूड* वजनाचे एक प्रचंड पोते होते. आम्ही सर्वसाधारणपणे ते एकत्र उचलून नेत होतो. एकटयाला ते फार जड होते. एक दिवस झोडपणीच्या खळयावर दानीयारची मजा करण्याचे आम्ही ठरविले. आम्ही ते पोते त्याच्या गाडीत टाकले व त्यावर दुसरी पोती टाकली. वाटेत मी आणि जामील्या एका रशियन खेडयात थांबलो व दुसऱ्याच्या बागेतील सफरचंदे आम्ही वेचली. वाटभर आम्ही हसत होतो व जामील्याने दानीयारकडे सफरचंदे फेकली. मग नेहमीप्रमाणे धूळ उडवून आम्ही त्याला मागे टाकले. खिंडीपलिकडे रेलमार्गाच्या क्रॉसिंगशी त्याने आम्हाला गाठले, फाटक आडवे होते. तेथून आम्ही स्टेशनपर्यंत एकत्र गेलो. त्या प्रचंड पोत्याचा आम्हाला पूर्ण विसर पडला होता. धान्य उतरवून झाल्यानंतर त्याच्याबद्दलचा विचारच आमच्या मनाला शिवला. जामील्याने खोडकरपणाने मला ढोसले व दानीयारकडे लक्ष वेधले. पोत्याकडे चिंताग्रस्त नजरेने पहात तो गाडीत उभा होता, काय करावे असा त्याचा निर्णय होईना. शेवटी हसू लपवणाऱ्या जामील्याला पाहताच तो लाजला, सारा प्रकार त्याच्या ध्यानात आला होता.

---

* पूड – १६ किलोग्राम.

"पँट वरती खेच, नाहीतर अर्ध्या वाटेत खाली घसरेल!" जामील्या ओरडली.

दानीयारने आमच्याकडे रागीट कटाक्ष फेकला; मग तो काय करत होता हे आमच्या ध्यानात येण्या-आधी त्याने गाडीच्या तळापासून पोते खेचले, टोकाशी ठेवले, खाली उडी घेतली, स्वतःचा तोल सावरून एका हाताने पाठीवर पोते घेतले. तो चालू लागला. त्याचे करणे प्रथम आम्हाला विशेष वाटले नव्हते, इतरांच्या अर्थातच ते ध्यानात आले नव्हते: पोते वाहून माणूस जात होता. पण सारेच पोती वाहात होते. दानीयार जेव्हा गँगवेपाशी आला, तेव्हा जामील्याने त्याला गाठले.

"पोतं सोड, मी मूर्खपणा करत होते!"

"दूर हो!" तो पुटपुटला, त्याने फळीवर पाय ठेवला.

"बघ तो पोतं वाहून नेतोय!" जामील्या ओरडली. जणू ती स्वतःचे समर्थन करत होती.

अजून ती मंद हसत होती, तिचे हसणे संयमित होते, जणू ती बळेच हसत होती.

दानीयार जास्तच लंगडत होता असे आमच्या ध्यानात आले. कशाला आम्ही आधी विचार केला नाही? त्या मूर्ख खोडीबद्दल आजही मी स्वतःला क्षमा करू शकत नाही. मीच मूर्खाने ती खोडी सुचवली!

"परत ये!" जामील्या ओरडली, तिच्या विचित्र हसण्याला पोकळ आवाज होता.

पण दानीयार परतू शकत नव्हता: मागचे लोक त्याच्या पाठीशीच होते.

नंतर काय घडले, त्याची आठवण करणे मला शक्य नाही. प्रचंड वजनाखाली दानीयार आणखी खाली वाकला, त्याचे डोके खाली झुकले होते, त्याच्या ओठात त्याचे दात गच्च रोवले गेले होते. जखमी पाय काळजीपूर्वक हलवत तो सावकाश चालत होता. प्रत्येक पावलाला त्याला वेदना होत होती, त्याच्या डोक्याला मागे झटका बसायचा व तो सेकंदभर थांबायचा. जेवढे उंचावर तो चढत होता, तेवढे तो जास्त लटपटायचा. पोते त्याला हेलकावे देत होते. भीतीपायी व शरमेपायी माझ्या तोंडाला कोरड पडली. भीतीने मी थिजलो होतो, त्याच्या जखमी पायाला असह्य होणारे ते ओझे माझ्या देहाच्या प्रत्येक कणाला जाणवत होते. तो एकदम झोकांडला, त्याच्या डोक्याला मागे झटका बसला, माझ्या डोळ्यांसमोर सारे काही उलट फिरले, मला अंधारी आली, माझ्या पायांखालची जमीन सरकली.

माझ्या हातावरच्या पोलादी पकडीमुळे दचकून मी शुद्धीवर आलो. जामील्याला पटकन मी ओळखले नाही. ती पांढरीफटक पडली होती, तिच्या डोळ्यांमधील बाहुल्या विस्फारल्या होत्या, नुकतेच उमटलेले हसू तिच्या ओठांवर अजून राहिले होते. दरम्यान एजंटासह गँगवेच्या पायथ्याशी सर्व धावले होते. दानीयारने आणखी दोन पावले टाकली. त्याने

पोते सावरण्याचा प्रयत्न केला, मग एका गुडघ्यावर तो अचानक खाली वाकू लागला. जामील्याने स्वतःचा चेहरा झाकला.

"टाक! पोतं टाक!" ती ओरडली.

जरी दानीयार ते सोडू शकला असता, तरी तो सोडत नव्हता. मागच्यांची खोटी करायची त्याची इच्छा नव्हती. जामील्याचा आवाज ऐकताच तो पुढे झेपावला. त्याने पाय ताठ केला, आणखी एक पाऊल टाकले व त्याच्या परत झोकांड्या जाऊ लागल्या.

"कुत्रीच्या, सोड!" एजंट ओरडला.

"सोड!" प्रत्येकजण ओरडला.

दानीयारने पुन्हा हट्ट धरला.

"नाही, तो सोडणार नाही!" कुणीतरी खात्रीपूर्वक कुजबुजले.

जोवर तो स्वतः त्याच्यासह पडणार नाही, तोवर तो पोते टाकणार नाही असे त्याच्या मागच्या-पुढच्यांना जाणवले होते. स्मशानशांतता पसरली. भिंतीपलिकडचे इंजिन कर्कश्य शिट्या मारत होते.

तापलेल्या लोखंडी छपराखाली दानीयार तंद्रीत असल्याप्रमाणे झोकांडत वर जात होता, गँगवेच्या खाली वाकणाऱ्या फळ्यांवर जात होता. तोल सावरण्यासाठी दर दोन पावलांगणिक तो थांबत होता. ताकद गोळा करून तो पुढे वर जाऊ लागला. जेव्हा तो थांबायचा, तेव्हा त्याच्या मागचे लोक थांबत. त्यामुळे ते दमत होते, त्यांची ताकद संपत होती, पण

कुणीही रागावला नव्हता, शिवी घालत नव्हता. ओझी घेऊन ते पुढे जात होते. जणू एका अदृश्य दोराने ते एकत्र बांधले गेले, जणू धोकादायक निसरड्या वाटेवर ते चालत होते, जेथे एकाचे जीवन दुसऱ्यावर अवलंबून होते. त्यांच्या शांततेत आणि एकसुरी झुलण्यात एकमेव अवजड ताल होता. दानीयारच्या पावलामागोमाग पाऊल पडत होते. सैनिकाची बायको दात आवळून मूक वेदनेने त्याच्याकडे पहात होती, त्याच्या मागोमाग चालत होती. तिचेच पाय लटपटत होते, ती जणू त्याच्यासाठी प्रार्थना करत होती.

अजून थोडे उरले होते, पण दानीयारचा परत झोक गेला, त्याचा जखमी पाय त्याच्या काबूत रहात नव्हता. त्याने पोते सोडायला पाहिजे नाहीतर तो पडणारच.

"धाव! मागून धर!" जामील्या मला ओरडली, गोंधळून तिने हात पुढे केले, जणू दानीयारला ती मदत करू शकत होती.

मी वरती धावलो, लोकांमधून व पोत्यांमधून वाट काढत होतो, मी दानीयारपर्यंत धावलो. त्याने हाताच्या कोपराखालून माझ्यावर नजर टाकली. त्याच्या काळसर ओल्या कपाळावर शीर थाड थाड उडत होती, त्याचे लालभडक डोळे माझ्याकडे तिरस्काराने जळजळत पहात होते. पोत्याला मागून टेकू देण्याचा माझा हेतू होता.

"इथून जा!" दानीयारने घोगऱ्या आवाजात धमकावले. तो पुढे सरकला.

धापा टाकणारा, लंगडणारा दानीयार जेव्हा खाली गेला, तेव्हा त्याचे निर्जीव हात लोंबत होते, लोकांनी बाजूला होऊन त्याला वाट दिली, पण एजंटचा संयम सुटला होता व तो ओरडला:

"काय रे वेड लागलं तुला? मी काय माणूस नाही? तुला खाली पोतं रिकामं करून मी दिलं असतं. कशाला अशी पोती वाहतोस?"

"ते माझं काम आहे," दानीयार शांतपणे उत्तरला.

तो बाजूला थुंकला व गाडीकडे चालत गेला. डोळे वर उचलण्याची आमची हिंमत नव्हती आणि आम्ही शरमलो होतो, आमच्या मूर्ख खोडकरपणाला दानीयारने गंभीरपणे मनावर घेतले ह्याचे आम्हाला वाईट वाटत होते.

रात्रभर आम्ही मुकाटपणे गाडीतून गेलो. दानीयारच्या दृष्टीने हे सवयीचे होते. अजून तो आमच्यावर चिडला होता अथवा तो प्रसंग पूर्णपणे विसरला होता हे आम्हाला नक्की समजत नव्हते. पण आमच्या विवेकाची टोचणी लागली होती, फार अवघड वाटत होते.

सकाळी झोडपणीच्या खळयावर जेव्हा आम्ही गाडीत पोती भरत होतो, जामील्याने ते नतद्रष्ट पोते

घेतले, त्याच्या कडेवर तिने ठामपणे पाय ठेवला व टर्रकन फाडले.

"घे तुझं फडकं!" वजन करणाऱ्याच्या पायाशी फेकत ती म्हणाली. "आणि पथक-प्रमुखाला सांग, पुन्हा अशी पोती पाठवू नको!"

"तुला काय झालंय?"

"काही नाही!"

दुसऱ्या सबंध दिवसभर दानीयारने स्वतःच्या अपमानाबद्दल कोणतीही प्रतिक्रिया दाखवली नाही, तो नेहमीप्रमाणे शांत होता. त्याचे लंगडणे मात्र जास्त ठळक दिसत होते, पोते वाहून जाताना ते विशेष जाणवत होते. त्याची जुनी जखम चिघळली होती: आमच्या अपराधाची ती सतत आठवण करून देत होती. असे असले तरीसुद्धा, जर तो हसला असता अथवा त्याने विनोद केला असता, तर आमच्यावरचा ताण नाहीसा झाला असता.

विशेष काही घडले नाही असा जामील्यानेही आव आणला. ती मानी मुलगी नेहमीप्रमाणे हसत होती, पण ती फार अवघडून गेली होती हे मला दिसत होते.

स्टेशनपासून घरापर्यंत जायला आम्हाला खूप उशीर झाला. दानीयार पुढे एकटा घोड्यावरून जात होता. रात्र सुरेख होती. ऑगस्टमधल्या ह्या रात्रींच्या वेळा अविस्मरणीय होत्या. दूरवर तारे चमकत होते.

एका ताऱ्याची कडा थिजल्याप्रमाणे भासत होती, खालच्या धरतीकडे आकाशातून चकितपणे पाहताना त्याचे बर्फाळ किरण चमचमत होते. खिंडीतून जाताना मी त्याच्याकडे पहात होतो. घोडे घरी जायला अधीर बनले होते, भरभर धावत होते, चाकांखाली खडी चुरडत होती. स्तेपमधून वाहात येणारा वारा फुलणाऱ्या दवण्याचा कडू वास आणत होता, पिकलेल्या गव्हाचा मंद सुगंध दरवळत होता, ह्या सर्व वासांमध्ये डांबराचा व घोड्यांच्या घामाचा दर्प मिसळला होता, त्यामुळे आमची डोकी हलकी बनली होती.

कड्याच्या एका बाजूवर वाढलेली काळसर काटेरी झुडुपे रस्त्याच्या दिशेला झुकली होती; दुसऱ्या बाजूवर खूप खाली वाळुंजीची जाळी वाढली होती, रानटी पॉप्लरची झाडे होती, अस्वस्थ कुरकूरेऊ नदी खळाळत वाहात होती. दूरच्या पुलावरून आगगाड्यांचा गडगडाट अधूनमधून ऐकू यायचा. त्या दूर अदृश्य झाल्यानंतर त्यांच्या चाकांचा खडखडाट रेंगाळायचा.

शांत वातावरणात घोड्यांच्या पाठींवर डुलत जायला छान होते. ऑगस्टमधील रात्रीचे आवाज ऐकायला, तिचे गंध हुंगायला मजा येत होती. जामील्या माझ्यापुढे घोड्यावरून जात होती. तिने लगाम सोडले होते व भोवती पहात ती अस्फुट गात होती. आमचे मौन तिच्यावर दडपण घालत होते हे

मला माहीत होते. अशा रात्री गप्प राहणे अशक्य होते – रात्रच गायला लावत होती.

म्हणून ती गाऊ लागली. आमच्या नात्यातील पूर्वीचा सहजपणा निर्माण करण्याच्या हेतूने कदाचित ती गात होती. अपराधाची भावना नाहीशी करण्याचा तिचा तो प्रयत्न होता. तिचा आवाज खणखणीत, खोडकर होता. नेहमीची खेड्यातील गाणी ती गात होती. "रेशमी रुमाल तुला हलवते" किंवा "दूरच्या वाटेवर माझा लाडका." तिला खूप गाणी ठाऊक होती आणि ती साधेपणाने मनापासून गात होती. तिची गाणी ऐकायला मधुर वाटत होते. एकदम तिने गाणे तोडले व दानीयारवर ती ओरडली:

"ए दानीयार, निदान गाणं म्हण! जिगित आहेस की कोण?"

"गा, जामील्या, गा!" गोंधळून दानीयार म्हणाला, त्याने घोड्याला आवरले. "मी दोन्ही कानांनी तुझी गाणी ऐकतोय."

"आम्हाला कान नाहीत असं वाटलं काय तुला? कुणी तुझ्यावर जबरी करत नाही, काय वाट्टेल ते कर!" आणि जामील्या परत गाऊ लागली.

तिने त्याला गायला का सांगितले कोण जाणे! कदाचित लहर म्हणून अथवा त्याला संभाषणात खेचण्याच्या हेतूने? दुसरे कारण संभवनीय असावे. लौकरच ती परत ओरडली:

"दानीयार, तू कधी प्रेमात पडलास?" ती हसली.

तो काही बोलला नाही. जामील्याही गप्प बनली.

"गाणं म्हण असं सांगायला काय पण माणूस हुडकला!" माझ्या मनात विचार आला.

रस्त्यावर आडव्या येणाऱ्या नदीपाशी घोडे मंदावले. ओलसर, रुपेरी दगडांवर त्यांच्या टापा खडखडू लागल्या. पायउतार ओलांडल्यानंतर दानीयारने घोड्यांना चाबूक मारला व अचानक गाणे म्हणायला आरंभ केला. त्याचा आवाज ताणलेला होता, रस्त्यावरच्या प्रत्येक हादऱ्याला त्याचा आवाज तुटत होता:

डोंगर माझे, निळे-पांढरे डोंगर,
माझ्या पूर्वजांची भूमी!

मग तो अडखळला, खोकला आणि पुढच्या दोन ओळी त्याने घोगऱ्या खर्जात गायल्या:

डोंगर माझे, निळे-पांढरे डोंगर,
मायभूमी माझी...

जणू कशाला तरी घाबरून तो पुन्हा थांबला व गप्प राहिला.

त्याच्या लाजण्याची मला स्पष्ट कल्पना आली. पण त्या अडखळत्या, भित्र्या गाण्यात खूप काही हेलावणारे होते, त्याचा आवाज छान होता: दानीयार गात होता ह्यावर विश्वास ठेवणे अशक्य होते.

"वाहवा!" मला राहवले नाही.

जामील्याही उद्गारली:

"पूर्वी कुठं होतास? गा पाहू, नीट गा!"

पुढे उजेड होता, खिंड संपत होती. दरीतून वाऱ्याची झुळूक येत होती. दानीयार पुन्हा गाऊ लागला. पूर्वीप्रमाणेच भित्रेपणाने व अनिश्चितपणाने तो गात होता, हळू हळू त्याच्या आवाजात भरदारपणा आला, त्याचा आवाज खिंडीत भरला, दूरच्या कड्यांमधून त्याचे प्रतिध्वनी उमटू लागले.

गीतामधील आवेगाचे मला आश्चर्य वाटले. त्याला काय म्हणायचे हे मला समजेना आणि आताही सांगता येत नाही, केवळ आवाजच नव्हे, तर त्याहून काही मोठे, थेट काळजातून उमटणारे, दुसऱ्यात तशीच भावना निर्माण करणारे, अंतरातील विचारांना जागे करणारे होते.

दानीयारच्या गाण्याला काही रीतीने पुन्हा निर्माण करणे जर मला शक्य झाले असते तर! त्यात शब्द विशेष नव्हते, पण शब्दांविना त्यातून माणसाचे काळीज व्यक्त होत होते. पूर्वी आणि नंतर मी असे गाणे कधी ऐकले नाही. ना ते किर्घिझ, ना कझाख गीत, पण त्यात दोन्हींचा समावेश होता. दोन

संबंधित लोकांच्या सुरावटींना दानीयारने एकत्र केले होते, त्यांची सुरेख गुंफण केली होती. ते पर्वतांचे व स्तेपचे गीत होते, कधी किर्घिझ पर्वतांवर झेपावणारे, तर कधी अफाट कझाख स्तेपवर गडगडत जाणारे.

ऐकताना माझे आश्चर्य वाढत गेले: "म्हणजे दानीयार असा आहे तर! कुणाचा विश्वास बसेल!"

आम्ही एव्हाना स्तेपमधल्या मऊ मळलेल्या वाटेवरून आलो होतो, दानीयारचा आवाज चढला होता, नवनवी गीते डौलाने त्याच्या गळयातून निघत होती. तो खरेच गुणी होता? काय घडले त्याला? जणू ह्या दिवसाची आणि ह्याच घटकेची तो वाट पहात होता!

लोक त्याला समजून घेत नसत आणि त्याच्या विचित्रपणाला हसत ह्याचे कारण चटकन मला उमजले, त्याचा स्वप्नाळूपणा, एकलेपणाची आवड, त्याचे मौनही. टेकडीवर तो संध्याकाळी आणि नदीतीरावर रात्री एकटा का घालवत होता हे मला समजले. इतरांना ऐकू न येणारे ध्वनी तो सतत का ऐकत होता, त्याचे डोळे अचानक का चमकत, त्याच्या आकुंचित भुवया का थरथरत ह्याची कारणे समजली. हा माणूस प्रेमात खोल बुडाला होता. पण केवळ दुसऱ्या व्यक्तीबद्दलचे हे प्रेम नव्हते, हे वेगळे प्रेम होते, ते जीवनाबद्दलचे, पृथ्वीबद्दलचे प्रचंड प्रेम होते. त्याने हे प्रेम अंतरात ठेवले होते, त्याच्या

संगीतात ठेवले होते, ते त्याचा मार्गदर्शक प्रकाश होते. ज्या रीतीने तो गात होता तसे बेफिकीर माणूस गाऊ शकला नव्हता, त्याचा आवाज कसाही असो हे महत्त्वाचे नाही.

शेवटचा स्वर विरत गेला होता असे भासले, पण एका गूढ लाटेने पेंगणाऱ्या स्तेपला जाग आणली आणि गायकाला ते कृतज्ञतेने ऐकत होते. गायकाचे घरचे गीत जणू कुरवाळल्याप्रमाणे भासत होते. कापणीची वाट पाहणाऱ्या राखी-पांढुरक्या गव्हावर सरोवराच्या पृष्ठभागासारख्या लाटा उमटल्या. पहाटेच्या पहिल्या सावल्या शेतावर पडल्या. चक्कीजवळच्या जुन्या वाळुंजींच्या बलाढ्य रेजिमेंटने पानांचा सळसळाट केला, नदीपलिकडे शेतमजुरांच्या शेकोट्या विझत चालल्या होत्या आणि एका घोडेस्वाराची अंधुक आकृती नदीतीरालगत खेड्याकडे दौडताना दिसली, कधी तो फळबागांमध्ये अदृश्य व्हायचा, कधी पुन्हा दिसायचा. वाऱ्याने सफरचंदांचा वास दरवळून टाकला, वातावरण स्तब्ध उबदार होते, फुलणाऱ्या मक्याचा दुधाप्रमाणे वास येत होता, वाळणाऱ्या गोवऱ्यांचा उबदार दर्प दरवळत होता.

दानीयार गातच होता, त्याला सर्व गोष्टींचा विसर पडला होता, मंत्रमुग्ध ऑगस्टची रात्र मूकपणे त्याला ऐकत होती. घोडेसुद्धा धावण्याऐवजी केव्हाच चालत होते. जणू शांततेचा भंग होईल अशी त्यांना भीती वाटत होती.

एका उंच लकेरीवर दानीयारने एकदम गाणे तोडले, त्याने घोड्यांना चाबूक मारला. मला वाटले जामील्या त्याच्यापाठी दौडेल आणि मी तिच्या मागोमाग जायला सज्ज झालो, पण ती जागची हलली नाही. ती मान खाली घालून हवेत तरंगणाऱ्या शेवटच्या कापऱ्या स्वरलहरी ऐकत होती. दानीयार घोड्यावरून गेला. आम्ही खेड्यापर्यंत काहीही बोललो नाही. बोलायची गरज नव्हती, कारण शब्द नेहमीच भावना व्यक्त करत नाहीत.

त्या दिवसापासून आमच्या जीवनांमध्ये बदल घडून आला. जणू एखाद्या अद्‌भुताची आणि खूप प्रेयसाची मी सतत वाट पहात होतो. सकाळी झोडपणीच्या खळ्यावर आम्ही गाड्या भरत होतो, स्टेशनवर जात होतो आणि घरच्या वाटेवर दानीयारची गाणी ऐकण्यासाठी घाईने परत निघत होतो. त्याचा आवाज माझा एक भाग बनला होता, तो सर्वत्र माझा पाठलाग करत होता, घोड्यांकडे सकाळी मी दवमाखल्या ओल्या घोडेघासावरून धावत असताना तो आवाज माझ्या पाठी यायचा, जेव्हा हसणारा सूर्य डोंगराआडून माझ्या स्वागताला वर यायचा, तेव्हा तो आवाज माझ्या मागून यायचा. म्हाताऱ्या भूस काढणाऱ्यांनी वाऱ्यावर फेकलेल्या गव्हाच्या सोनेरी पावसाच्या सळसळीत मी त्याचा आवाज ऐकत होतो, स्तेपवर खूप उंचावर घिरट्या घालणाऱ्या एकाकी बहिरीससाण्याच्या डौलदार उड्डाणात त्याचा आवाज

मला ऐकू यायचा. मी पाहिलेल्या प्रत्येक गोष्टीत दानीयारचे गाणे ऐकू यायचे.

संध्याकाळच्या वेळांना खिंडीतून आम्ही जात असताना जणू मी दुसऱ्या जगात पाठवला जात आहे असा मला भास व्हायचा. डोळे अर्धवट मिटून मी त्याचे गाणे ऐकायचा. लहानपणची परिचित दृश्ये आश्चर्यकारकरीत्या माझ्या नजरेसमोर उभी रहात: कधी मऊ, धुरकट-निळे सरकते वासंतिक ढग तंबूवरून जात असत; कधी रणरणत्या धरतीवरून घोड्यांचे कळप उन्हाळी कुरणांकडे दौडत जायचे आणि लांब केसांची झुलपे असलेली व डोळ्यांमध्ये काळी चमक असलेली शिंगरे घोड्यांना अभिमानाने मागे टाकायची; कधी मेंढ्यांचे कळप लाव्हारसाप्रमाणे सावकाशपणे डोंगरउतारांवरून पसरत; कधी पाण्याचा धबधबा कड्यावरून उडी मारायचा, त्याचे पांढरे फेसाळते पाणी डोळे दिपवायचे; कधी नदीपलिकडच्या टोकदार गवताच्या दाटीत सूर्य हळुवार बुडायचा आणि तुफानी घोडेस्वार क्षितिजकडेशी सूर्याचा पाठलाग करायचा, जणू त्याने हात पुढे करायचा अवकाश – त्याचा सूर्याला स्पर्श झाला असता आणि तोसुद्धा गवतात व संधिप्रकाशात नाहीसा व्हायचा.

नदीपलिकडचे कझाख स्तेप विस्तीर्ण आहे. स्वत:ला जागा करून घेण्यासाठी त्याने पर्वतांना वेगळे सरकवले आहे आणि त्यांच्यामध्ये ते निर्जन पसरले

आहे. त्या युद्धातील पहिल्या अविस्मरणीय उन्हाळ्यात स्तेपमध्ये आगी पेटल्या होत्या, सैन्यातील घोड्यांच्या झुंडींनी गरम धुळीत स्तेपला अंधुक बनवले आणि सर्व दिशांनी स्वार दौडत होते. समोरच्या तीरावरून दौडत येणारा एक कझाख गुराख्याच्या घोगऱ्या आवाजात ओरडताना मला आठवतो:

"किर्घिझांनो, घोड्यांवर खोगीरं चढवा, शत्रू आलाय!" मग धुळीच्या लोटात आणि गरम हवेच्या झोतात तो नाहीसा बनला.

प्रत्येकजण आव्हानाला तोंड द्यायला उठला: डोंगरातून उतरणाऱ्या, दऱ्यांमधून सरकणाऱ्या आमच्या पहिल्या घोडदळ डिव्हिजनांबरोबर एक गंभीर आणि मेघगर्जनेसारखा गडगडाट येत होता. हजारो रिकीबी खणखणत होत्या, हजारो जिगित घोड्यांवर स्वार झाले होते; त्यांच्या पुढे रंगीत काठ्यांवर तांबड्या पताका फडकत होत्या, घोड्यांच्या खुरांनी उडवलेल्या धुळीमागून मातांच्या आणि सहचरींच्या आर्त किंकाळ्या धरतीवर आपटत होत्या: "स्तेप तुम्हाला मदत करो, आमचा बाहुबली मानस तुम्हाला मदत करो!"

ज्या वाटांवरून पुरुष युद्धावर गेले त्या वाटा दुःखी बनल्या.

ऐहिक सौंदर्याच्या आणि चिंतेच्या ह्या महान जगाला दानीयारच्या गाण्याने माझ्या डोळ्यांपुढे पूर्ण उघडले. हे सर्व त्याने कुठे शिकले होते? त्याने कुणापासून हे ऐकले? अनेक वर्षे मायभूमीची आस

बाळगणाऱ्या माणसाला ह्या प्रेमाच्या यातना सहन कराव्या लागल्या असाव्यात आणि केवळ तोच असे प्रेम करू शकेल असे मला वाटले. तो जसा गात होता, तसे त्याचे बालरूप माझ्या डोळ्यांसमोर उभे राहिले, स्तेपमधल्या रस्त्यांवरून त्याची बालमूर्ती भटकत होती. कदाचित त्याच्या मायभूमीच्या ह्या गाण्यांनी त्याच्या आत्म्याला प्रथम जाग आणली असावी? किंवा युद्धाच्या पेटत्या वाटांवर तो जात होता तेव्हा?

त्याचे गाणे ऐकून धरतीमातेवर आडवे पडून तिला प्रेमाने कृतज्ञपूर्वक घट्ट मिठी मारावी असे मला वाटले. तेव्हा मला अंतरात एक नवी जाग जाणवली, ती शब्दांमध्ये व्यक्त करता येत नाही. ती काहीतरी अदम्य होती, स्वतःला व्यक्त करण्याची ती ऊर्मी होती, जग केवळ पहावे आणि जाणवून घ्यावे असे नव्हे, तर माझ्या दृष्टीमार्फत, विचारांमार्फत, भावनांमार्फत इतरांना ते पहायला लागावे, दानीयार जसा उत्तेजित होऊन ह्या जगाचे सौंदर्य बघत होता, त्या सौंदर्याबद्दल लोकांना सांगावे असे मला वाटत होते. अज्ञाताच्या भीतीने आणि आनंदाने मी श्वास रोधून धरायचा, कारण हाती कुंचला घेणे हे माझे जीवितकार्य होते हे तेव्हा मला समजले नव्हते.

लहानपणापासून चित्रे काढणे मला आवडायचे. अभ्यासाच्या पुस्तकांमधल्या चित्रांची मी नक्कल करायचा, मुले म्हणायची की, मला "हुबेहूब"

जमायचे. शाळेतील शिक्षकही माझे कौतुक करायचे. आमच्या भित्ती-वृत्तपत्रासाठी मी चित्रे न्यायचा. युद्ध सुरू झाले, तेव्हा माझ्या भावांना सैन्यात बोलावणे आले. मी शाळा सोडली व सामुदायिक शेतावर कामाला गेलो, माझ्या वयाच्या प्रत्येक मुलाने तसे केले होते. कुंचल्यांचा आणि रंगांचा मला विसर पडला, त्यांच्याबद्दल पुन्हा विचार कधी करेन असेही मला कधी वाटले नव्हते. पण दानीयारच्या गाण्यांनी माझ्या मनाला खळबळवून टाकले. मी तंद्रीत होतो, मी जगाकडे गोंधळून पहात होतो, जणू प्रत्येक गोष्ट मी प्रथमच पहात होतो.

जामील्यामध्ये खूप मोठा बदल घडला! जणू ती चुणचुणीत, तिखट जिभेची मुलगी पूर्वी कधी अस्तित्वातच नव्हती. वासंतिक खिन्नता तिच्या धुकट डोळ्यांमध्ये दाटायची. वाटेत ती सतत खूप विचारात गढायची. तिच्या ओठांवर अस्फुट, स्वप्नाळू स्मित विलसायचे. फक्त तिला ठाऊक असलेल्या गोष्टीचा ती आनंद लुटायची. जणू खळाळत्या नदीच्या किनारी उभे असावे अशा भीतीने घेरल्या अनिर्णित अवस्थित ती खांद्यावर पोते धरून अनेक वेळा उभी रहायची. दानीयारला ती टाळायची आणि त्याच्याकडे थेट बघायची नाही.

एकदा झोडपणीच्या खळयावर यातनेपायी असहाय बनलेल्या चिडक्या आवाजात जामील्या दानीयारला म्हणाली :

"सदरा काढ. मी धुवून देते."

नंतर तिने नदीत सदरा धुतला, तो वाळवायला पसरला व त्याच्याजवळ ती बसली. ती सदऱ्याच्या सुरकुत्या काळजीपूर्वक सरळ करत होती. त्यावरचे विरविरलेले खांदे पाहून तिने खेदाने डोके हलविले, खिन्नपणे ती सदरा सपाट करत होती.

जामील्या फक्त एकदाच मोठ्यांदा व पूर्वीप्रमाणेच परिणामकारक हसली, तिचे डोळे पूर्वीप्रमाणेच चमकत होते. एके दिवशी तरुणींचा आणि सैन्यातून बाहेर पडलेल्या जिगितांचा घोळका खळ्यावर आला. ते घोडेघास रचत होते.

"ए बाय*, पांढरा पाव खाण्याची फक्त तुम्हाला एकट्यालाच इच्छा होत नाही! आम्हाला पाव द्या, नाहीतर तुम्हाला नदीत फेकू!" जिगित ओरडले व त्यांनी मजेने दाताळ्यांनी धमकावले.

"तू आम्हाला घाबरवू शकत नाही! मुलींसाठी मी काहीतरी शोधीन, पण तुझ्यासाठी तूच पाठव!" जामील्या आनंदाने उत्तरली.

"तसं असेल तर तुम्हा सर्वांना पाण्यात फेकीन!"

तरुण-तरुणींची मस्ती चालू झाली. ओरडत, किंचाळत त्यांनी एकमेकांना पाण्यात ढकलले.

"त्यांना पकड! ओढ!" जामील्या सर्वांत

---

* बाय — श्रीमंत जमीनदार.

मोठ्यांदा हसत होती, अंगावर चालून येणाऱ्यांना ती सुरेख हुलकावणी देत होती.

आश्चर्य म्हणजे जिगितांचा सारा रोख जामील्यावर होता. प्रत्येकजण तिला पकडायचा प्रयत्न करत होता. अचानक तिघांनी तिला पकडले आणि किनाऱ्यापर्यंत उचलून नेले.

"आम्हाला पापी दे! नाही तर पाण्यात फेकू!"

"चला रे तिला झोका द्या!"

जामील्या चळवळत, धडपडत होती, हसत ती मैत्रिणींना मदतीसाठी बोलवीत होती, पण मैत्रिणी किनाऱ्यावरून धावत होत्या, पाण्यातून स्वतःचे रुमाल उचलत होत्या. जिगितांनी खिदळताना जामील्याला नदीत बुडवले. ओघळत्या केसांसह ती पाण्यावरती आली, पूर्वीपेक्षाही जास्त सुंदर दिसत होती. तिचा ओला सुती पोषाख तिच्या अंगाला चिकटला, तिच्या सुरेख नितंबांच्या आणि कोवळ्या स्तनांच्या ठळक रूपरेषा दिसत होत्या. पण तिचे लक्ष कुठेही नव्हते, ती नुसती हसत होती, पाण्याच्या प्रवाहाबरोबर मागे-पुढे होत होती, तिच्या लालबुंद चेहऱ्यावर पाणी निथळत होते.

"पापी दे!" जिगित म्हणाले.

जामील्याने त्यांच्या पाप्या घेतल्या, पण तरुणांनी हसत तिला परत पाण्यात बुडवले, ओल्या केसांना तिने चेहऱ्यावर आडवे टाकले.

तरुणांच्या खोड्यांना खळ्यावरचे लोक हसत होते.

म्हाताऱ्या भूसवाल्यांनी फावडी फेकली व डोळ्यांमधील पाणी पुसले. त्यांच्या काळसर चेहऱ्यांवरच्या सुरकुत्या आनंदाने चमकत होत्या, त्यांच्या चित्तवृत्ती तारुण्याने परत फुलल्या. मीसुद्धा मनापासून हसलो, जिगितांपासून जामील्याचे रक्षण करण्याचे माझे पवित्र कर्तव्य एकदम विसरलो.

एकटा दानीयार गप्प होता. एकदम माझे त्याच्याकडे ध्यान गेले व मीही गप्प झालो. झोडपणीच्या खळ्याच्या कडेशी त्याची एकाकी आकृती दिसत होती, दोन्ही पाय फाकवून तो उभा होता. जिगितांपासून जामील्याला खेचून घेण्यासाठी तो पुढे धावणार आहे असे मला वाटले. तो तिच्याकडे टक लावून बघत होता, त्याच्या नजरेत कौतुक व खिन्नता होती, त्यांच्यात आनंद आणि यातना होती. जामील्याचे सौंदर्य त्याच्या सुखाचे व दुःखाचे उगम होते. जेव्हा जिगित आळीपाळीने पुढे सरसावत तिच्याशी पापी घेण्याची लगट करू लागले, तेव्हा खाली डोके करून त्याने जाण्याचा बहाणा केला, पण तो निघून गेला नाही.

दरम्यान जामील्याचेही त्याच्याकडे लक्ष गेले.

ती हसायची पटकन थांबली व तिने डोके खाली केले.

"पुरे चावटपणा!" अचानक तिने बंडखोर जिगितांना आवर घातला.

त्यांच्यापैकी एकाने तिला मिठी घालण्याचा प्रयत्न केला.

"चालते व्हा!" त्याला ढकलत ती ओरडली. तिने दानीयारकडे अपराधी कटाक्ष फेकला, मग पोषाख पिळून काढण्यासाठी ती झुडुपांमध्ये धावली.

त्यांच्यामधील नाते मला अजून खूपसे कळले नव्हते, खरे तर त्याबद्दल विचार करण्याची मला भीती वाटत होती. तरीही दानीयारला टाळल्यामुळे जामील्या उदास बनलेली पाहताच मी दुःखी झालो त्यापेक्षा जर तिने पूर्वीप्रमाणे त्याची चेष्टा केली असती तर जास्त चांगले ठरले असते. त्याचवेळी दानीयारच्या गाण्यांच्या साथीवरचा रात्रींचा खेड्याकडचा परतीचा प्रवास माझ्यामध्ये एका विचित्र भावनेला निर्माण करण्यास कारणीभूत ठरला. ती दोघे सुखी व्हावीत असे मला मनोमन वाटत होते.

आम्ही खिंडीतून जात होतो तेव्हा जामील्या गाडीत बसायची, पण स्तेपमध्ये ती गाडीबरोबर चालायची, मीसुद्धा चालायचा. तसे चालताना दानीयारचे गाणे ऐकत जाणे छान वाटायचे. प्रथम आम्ही आपापल्या गाडीमागून चालत असू, नंतर नकळतपणे एक विचित्र शक्ती आम्हाला दानीयारपाशी न्यायची. त्याचा चेहरा, त्याचे डोळे पाहण्याची आम्हाला इच्छा व्हायची. उदास दानीयार खरेच गात होता?

प्रत्येक वेळी जामील्या थक्क झालेली अथवा

हेलावलेली मी पहायचा. ती सावकाशपणे स्वत:चा हात त्याच्याकडे पुढे करायची, पण त्याचे लक्ष नसायचे, कारण तो दूर कुठेतरी बघत रहायचा, डोक्यामागे हात धरून डुलत जायचा. मग जामील्याचा हात गाडीच्या कडेशी असाहायपणे खाली पडायचा. ती दचकायची, हाताला झटका देऊन चालायची थांबायची. रस्त्याच्या मध्यभागीच मान खाली घालून थांबायची, डोळ्यांनी त्याचा पाठलाग करायची व पुन्हा चालू लागायची.

जामील्याला आणि मलाही सारख्याच अगाध भावना छळत होत्या असे काही वेळा मला वाटायचे. आमच्या मनांमध्ये सुप्त भावना जागी होण्याचा घटिका आली होती?

झोडपणीच्या खळयावरच्या कामाच्या वेळी जामील्या सर्व काही विसरायची, पण सवडीच्या अवघ्या काही क्षणांमध्ये ती कमालीची अस्वस्थ व्हायची; भूस काढणाऱ्यांजवळ ती उभी रहायची, काही वेळा गहू भरून काही फावडी वाऱ्यावर उधळायची, तिच्या हालचाली सहज व डौलदार होत, मग एकदम फावडे टाकून ती कडब्याच्या गंजींपर्यंत चालत जायची. तेथे ती सावलीत बसायची, जणू एकटेपणाला घाबरून मला हाक मारायची:

"इकडं ये, किचिने बाला, जरा बसूया!"

मला नेहमी अपेक्षा होती की, ती मला काही महत्त्वाचे सांगेल, तिला छळणारी चिंता मला

समजावून सांगेल. पण ती काहीही म्हणायची नाही. मूकपणे माझे डोके स्वतःच्या गुडघ्यांवर टेकवायची. मग माझ्या राठ केसांमध्ये बोटे फिरवून दूर बघायची, गरम उबदार थरथरत्या हातांनी माझा चेहरा कुरवाळायची. चिंतेने ग्रासलेल्या आणि आसावलेल्या तिच्या चेहऱ्याकडे मी वरती पहायचा आणि त्यात मला स्वतःला ओळखल्याचा भास होई. काहीतरी तिला छळत होते, तिच्या काळजात काहीतरी दाटत होते, बाहेर फुटायची ते मागणी करत होते, तिला त्याची भीती वाटत होती. प्रेमाची तिला यातनादायी इच्छा होती, पण त्या प्रेमाची कबुली देण्याची तिची तेवढीच इच्छा नव्हती. तिने दानीयारच्या प्रेमात पडू नये आणि त्याच वेळी पडावीही, असे मला वाटत होते. सरतेशेवटी, ती माझ्या आई-बापांची सून होती, माझ्या भावाची बायको होती.

असे विचार क्षणभंगुर असायचे, मी त्यांना मनातून पळवून लावायचा. लहान बाळाप्रमाणे विलग बनलेले तिचे नाजुक ओठ पाहण्यात, आसवांनी धुंदकारलेले तिचे डोळे पाहण्यात माझा सर्वांत मोठा आनंद होता. किती सुरेख, सुंदर होती ती! तिचा स्फूर्तिदायी चेहरा मला आवेगपूर्ण बनवायचा, मला हे जाणवायचे, पण त्यावेळी उमजायचे नाही. आत्तासुद्धा मी वारंवार स्वतःला विचारतो: चित्रकाराला, कवीला ज्या स्फूर्तीच्या भावनेचा अनुभव येतो, तोच अनुभव

प्रेमापायी प्राप्त होत असावा? जामील्याकडे टक लावून पाहिल्यानंतर मला स्तेपमध्ये धावावेसे वाटायचे, आकाशाला आणि धरतीला हाक मारावीशी वाटायचे, माझ्यात निर्माण होणाऱ्या विचित्र चिंतेवर आणि आनंदावर मात कशी करू असे विचारावेसे वाटे. एकदा मला माझे उत्तर बहुधा मिळाले.

नेहमीप्रमाणे आम्ही स्टेशनवरून परतत येत होतो. रात्र पडली होती. तारे आकाशात मधमाशांच्या झुडींप्रमाणे दिसत होते, स्तेप झोपत होते आणि दानीयारचे गीत स्तब्धतेचा फक्त भंग करत होते, मऊ दूरच्या अंधारात ते घुमत होते व विरत जात होते. मी त्याच्या पाठोपाठ जात होतो.

त्या रात्री दानीयारला काय झाले होते ते मला माहीत नाही–त्याच्या आवाजात सखोल हळुवार खिन्नता होती, फार एकाकीपणा होता. तो आवाज आमच्या डोळयांमध्ये सहानुभूतीची आसवे आणत होता.

गाडीच्या कडेशी घट्ट धरून जामील्या चालत होती, तिचे डोके कलले होते. जेव्हा दानीयारचा आवाज वर चढला, तिने डोक्याला झटका दिला, गाडीत उडी घेतली व त्याच्या शेजारी ती बसली. छातीवर हातांची घडी घालून ती दगडासारखी स्तब्ध बसली. ती दोघे जास्त चांगली दिसावीत म्हणून मी घाईघाईने पुढे चालत होतो. जामील्याची दखल न घेता दानीयार गात होता. तिचे हात खाली पडलेले

मी पाहिले, ती त्याच्याकडे झुकली व तिने त्याच्या खांद्यावर डोके टेकवले. चाबकाचा तडाखा बसताच घोडा क्षणात जसा गती बदलतो, तसा त्याचा आवाज कापरा बनला, तो पूर्वीपेक्षा जास्त प्रभावीपणे घुमू लागला. तो प्रेमगीत गात होता!

मी थक्क बनलो होतो. स्तेप फुलत होते, ते हिंदकळत होते, अंधारात अलग होत होते, त्या अफाट विस्तारात मी दोन प्रेमिकांना बघत होतो. ती दोघे मला पहात नव्हती, त्यांच्या दृष्टीने मी अस्तित्वात नव्हतो. गाण्याच्या तालात ती डुलत होती, त्यांना जगाचा विसर पडला होता. मी जवळून चालत त्यांना पहात होतो, पण मला ती ओळखू येत नव्हती. उघड्या गळ्याचा जीर्ण सैनिकी सदरा घातलेला तोच दानीयार होता, अंधारात त्याचे डोळे पेटते भासत होते. त्याला घट्ट बिलगून बसलेली, नरम व भित्री बनलेली तीच माझी जामील्या होती, तिच्या पापण्यांवर आसवे चमकत होती. ही दोन नवजात माणसे होती, त्यांचे सुख अभूतपूर्व होते. हे सुख नव्हते काय?

मायभूमीबद्दलचे थोर प्रेम दानीयार तिला देत नव्हता? त्या प्रेमाने ह्या संगीताला स्फूर्ती दिली होती. तो तिच्यासाठी गात होता, तो तिच्याबद्दल गात होता.

मला विचित्र उत्तेजित भावनेने घेरले, दानीयारचे गाणे नेहमी असे करायचे. मला काय हवे होते हे

मला अचानक समजले. मला त्यांचे चित्र रंगवायचे होते.

माझ्या विचाराची मला भीती वाटली, पण भीतीपेक्षा इच्छा जास्त मोठी ठरली. सुखात हरवलेली अशी त्यांना चितारायचे होते! नेमक्या त्या वेळी तशी ती दिसत होती! असे चितारणे मला शक्य होईल? भीती आणि आनंदापायी माझा श्वास रोधला. मी तंद्रीतल्या माणसाप्रमाणे चालत होतो. मीसुद्धा आनंदी होतो, कारण ही इच्छेची ऊर्मी भावी काळात मला कितपत त्रास देईल ह्याची अजून मला कल्पना नव्हती. दानीयार धरतीला जसे बघत होता, तसे धरतीला बघावे असे मी स्वतःला सांगितले होते, त्याचे गाणे रंगांमधून मी दाखविणार. डोंगर, स्तेप, माणसे, गवत, ढग, नद्या माझीही बनतील. मग मनात विचार चमकला: मला रंग कुठे मिळतील? शाळेत मला रंग देणार नाही, त्यांनाच रंगांची गरज होती! जणू ही त्यांची मुख्य समस्या होती!

अचानक दानीयार गायचा थांबला. जामील्याने उत्स्फूर्तपणे त्याला हातांची मिठी घातली, पण ती पटकन मागे सरली, क्षणभर थिजली, तिने खाली उडी घातली. दानीयारने लगाम घुटमळत खेचले, घोडे थांबले. जामील्या त्याच्याकडे पाठ करून रस्त्यावर उभी होती. मग तिने डोक्याला झटका दिला, त्याच्याकडे तिरपा कटाक्ष टाकला आणि रडव्या सुरात म्हटले:

"बघतोस काय?" क्षणभर थांबून ती कठोरपणे म्हणाली: "माझ्याकडं बघू नको, पुढं जा!" ती तिच्या गाडीपाशी गेली. "तोंड उघडं टाकून बघतोस काय?" ती माझ्यावर ओरडली. "गाडीत चढ आणि तुझे लगाम घे! तुमचा वैताग आलाय!"

"एकदम तिला काय झालं!" न उमजून मी घोडे पळवले. त्यात न समजण्यासारखे विशेष काय होते: ती कमालीची निराश बनली होती, ती विवाहित होती आणि तिचा नवरा जिवंत होता. सारातोवमध्ये तो इस्पितळात होता. मला कशाचाही विचार करण्याची इच्छा नव्हती. मला तिचा आणि माझा राग आला, कदाचित मला तिचा तिटकाराही वाटला असता, जर मला माहीत झाले असते की, दानीयार आणखी गाणार नाही आणि त्याचा आवाज पुन्हा कधी मी ऐकणार नाही.

माझे सर्व अंग दुखत होते, गवताच्या गंजीवर जाऊन पडण्याची तीव्र इच्छा होत होती. घोडे अंधारात मागे सरले, गाडी असह्य करकरली, माझ्या हातून लगाम निसटत होते.

झोडपणीच्या खळयावर मला जोखड जेमतेम काढता आले, मी गाडीखाली ते फेकले. गवतापाशी पोहोचताच मी पटकन अंग टाकले. ह्यावेळी दानीयार घोड्यांना कुरणात घेऊन गेला.

दुसऱ्या दिवशी सकाळी मी आनंदाच्या भावनेसह जागा झालो. मी जामील्याचे आणि दानीयारचे चित्र

काढणार होतो. डोळे मिटून ते चित्र मी कल्पनेने पाहू लागलो. चित्र सुरू करण्यासाठी मला केवळ रंगांची व कुंचल्याची गरज होती.

मी नदीकडे धावलो, मग घोड्यांपाशी धावलो. माझ्या उघड्या पायांना थंड, ओल्या घोडेघासाचे फटकारे बसत होते. तडकलेल्या माझ्या तळव्यांना वेदना होत होत्या, पण मला छान वाटत होते. माझ्याभोवतालच्या सर्व गोष्टींची मी धावताना दखल घेत होतो. डोंगराआडून सूर्य उगवत होता आणि कालव्याजवळचे सूर्यफूल सूर्याकडे वळले होते. पांढऱ्या शेंड्यांचे उंच गवत त्याभोवती हपापल्यासारखे दाटी करत होते, तरीही सूर्यफूल सकाळचे ऊन खात ताठ उभे होते, सूर्याच्या पिवळ्या ज्वाला खेचत होते, स्वतःच्या बियांच्या जड टोपीत त्यांना पीत होते. फाट्यावर चाकांनी चिखल तुडवला होता, चाकोऱ्यांमधून पाणी निथळत होते. कमरेपर्यंत उंच सुगंधी बडीशेपेचे जांभळट बेट होते. माझ्या मायभूमीवरून मी धावत होतो, डोक्यावर पाकोळ्या शर्यत खेळत होत्या – अरेरे! सकाळचा सूर्य पकडायला माझ्यापाशी रंग असते तर! निळसर-पांढरे डोंगर, दवभिजले घोडेघास आणि कालव्याच्या कडेशी उभे असलेले एकाकी सूर्यफूल.

झोडपणीच्या खळयावर जेव्हा मी परतलो, तेव्हा माझ्या आनंदी मनःस्थितीवर उदासीनतेचे ताबडतोब मळभ आले. जामील्या दुःखी असलेली मी पाहिले.

तिचा चेहरा कोमेजला होता, तिच्या डोळयांखाली काळी वर्तुळे होती; कदाचित तिने रात्र निद्राविहीन काढली असावी. तिने माझ्याकडे स्मित केले नाही, ती माझ्याशी बोलली नाही. जेव्हा ओरोझमात आला, तेव्हा जामील्या त्याच्यापाशी जाऊन म्हणाली:

"तुमची गाडी घ्या! पाहिजे तिकडं पाठवा, स्टेशनावर मी जाणार नाही!"

"काय झालं ग पोरी! गोमाशी तुला चावली?" ओरोझमात चकित झाला.

"गोमाशा वासरांच्या शेपटाखाली चावतात! मला प्रश्न विचारू नका! एकदा सांगितलं–नाही जाणार, तर जाणार नाही!"

ओरोझमातचे स्मित मावळले.

"तुला काय पाहिजे त्याची मला फिकीर नाही! तरीही तुला काम करावं लागेल!" त्याने कुबडी जमिनीवर आपटली. "जर कुणी तुझा अपमान केला, तर सांग मला, ह्या कुबडीनं त्याचं डोकं फोडतो! तसं जर नसेल, तर मूर्खपणा करू नको: सैनिकांचा गहू वाहून ने, तिथं तुझाच नवरा आहे!" एकदम वळून तो लंगडत निघून गेला.

जामील्या शरमली, दानीयारकडे बघून तिने सुस्कारा टाकला. घोड्याच्या गळपट्ट्याला हिसके देत तो बांधत होता, त्याची जामील्याकडे पाठ होती. त्याने त्यांचे संभाषण ऐकले. जामील्या थोडा वेळपर्यंत

चाबूक हातात खेळवत होती, मग बेफिकीरपणे खांदे उडवून तिच्या गाडीकडे गेली.

त्या दिवशी आम्ही नेहमीपेक्षा लौकर परतलो. दानीयारने सबंध वाटभर घोडे पळवले. जामील्या गप्प व उदास होती. माझ्यासमोर भाजलेले, काळवंडलेले स्तेप पसरले होते ह्यावर माझा विश्वासच बसत नव्हता. केवळ काळपर्यंत ते वेगळे होते. जणू एखाद्या परीकथेत मी त्याच्याबद्दल ऐकले होते, माझ्या अंतरात जागे झालेले सुखाचे चित्र क्षणभरही जाईना. जीवनाची एक सर्वांत तेजस्वी कडा मी पकडली होती. माझ्या कल्पनेत तिला तपशीलवार पुन्हा निर्माण केली होती, त्या कल्पनेने माझा प्रत्येक विचार व्यापला होता. वजनवाल्याकडून एक जाड पांढरा कागद चोरेपर्यंत मला स्वस्थ बसवेना. मी धावत गेलो आणि गवताच्या गंजीमागे लपलो. माझे काळीज जोरात धडधडत होते, वाटेत जाताना उचललेल्या फावड्याच्या पाठीमागच्या लाकडी गुळगुळीत बाजूवर मी तो कागद ठेवला.

"अल्ला तुझं भलं करो!" मला घोड्याच्या पाठीवर प्रथम बसवताना माझे वडील जसे पुटपुटले होते, तसेच मी आता पुटपुटलो. मग मी कागदाला पेन्सिल लावली. न शिकवलेल्या त्या माझ्या प्रथम रेषा होत्या. जेव्हा दानीयारचे नाक-डोळे कागदावर उमटले, तेव्हा मला सर्व गोष्टींचा विसर पडला. ऑगस्टमधील रात्रीच्या स्तेपची मी कल्पना केली, मग त्याचे गाणे ऐकण्याची कल्पना केली, उघड्या गळ्याने

डोके मागे टाकलेला तो मला दिसला, त्याच्या खांद्यावर टेकलेली जामील्या मला दिसली. गाडीत ती दोघे होती, गाडीच्या पुढच्या भागात लगाम फेकलेले होते, अंधारात घोड्यांच्या पाठी हलत होत्या, पलीकडे स्तेप होते आणि दूरवर तारे होते.

मी माझ्या कामात खूप गर्क होतो, मला एकही आवाज ऐकू येत नव्हता, मग कुणाचा तरी वरून आवाज येताच मी दचकलो.

"बहिरा झालास?"

ती जामील्या होती. मी शरमलो, लाजलो, पण पटकन चित्र लपवले नाही.

"गाड्या केव्हाच भरल्यात, आम्ही तुला गेला एक तासभर हाका मारतोय! इथं काय करतोस? हे काय?" चित्र उचलत तिने विचारले. "हं!" रागाने तिने खांदे उडवले.

मी मरण पत्करले असते. खूप वेळपर्यंत ती चित्र पहात होती, शेवटी तिने तिचे खिन्न, ओलसर डोळे माझ्याकडे वर उचलले.

"किचिने बाला, दे ते मला. आठवण म्हणून ते मी दूर ठेवीन," हळूच ती म्हणाली. चित्राला घडी घालून तिने ते पोलक्यात ठेवले.

आम्ही एव्हाना रस्त्यावर आलो होतो, तरीही मी वास्तवात अजून येऊ शकत नव्हतो. ते सारे स्वप्न भासत होते. जे मी पाहिलेले होते, ते चित्र मी काढले होते ह्यावर माझा विश्वास बसत नव्हता.

तरीही माझ्या काळजात विजयाची भाबडी भावना होती, नव्हे अभिमानाची. स्वप्ने एकाहून एक धाडसी पडत होती, एकाहून एक आकर्षक भासत होती, त्यामुळे माझे डोके गरगरू लागले. आता अनेक चित्रे काढायची मला इच्छा होती. ती रंगचित्रे असतील, नुसती रेखाचित्रे नसतील. आमच्या वेगवान गतीकडे मी लक्ष दिले नाही. दानीयार त्याच्या घोड्यांना जोरात पळवत होता. जामील्या मागे पडली नव्हती. ती भोवती पहात होती, काहीवेळा तिचे स्मित हृदयस्पर्शी होते. मीही स्मित केले, कारण त्याचा अर्थ आता ती इतःपर आमच्यावर रागावली नव्हती. जर तिने विनंती केली असती तर दानीयार आज गायला असता...

स्टेशनवर नेहमीपेक्षा खूप लौकर आम्ही आलो, आमचे घोडे घामेजले होते. गाड्या उभ्या करताच दानीयार माल उतरवू लागला. त्याला काय झाले होते? एवढी घाई का करत होता? मधून मधून तो थांबायचा आणि गडगडत जाणाऱ्या आगगाड्यांकडे टक लावायचा. तो कसला विचार करत होता हे जाणण्याच्या प्रयत्नात जामील्या त्याच्या दृष्टीचा पाठलाग करायची.

"इकडं ये ह्या घोड्याचा नाल ढिला पडलाय. तो खेचायला मला मदत कर," तिने त्याला बोलावले.

दानीयारने स्वतःच्या गुडघ्यांमध्ये घोड्याचा खूर

काढला, तो ताठ उभा झाला, जामील्याने त्याच्या डोळ्यांमध्ये थेट पाहून अस्फुटपणे विचारले:

"तुला समजत नाही?.. किंवा जगात मी फक्त एकटी?"

दानीयारने मूकपणे डोळ्यांनी उत्तर दिले.

"मला सोपं जातं असं तुला वाटतं?" जामील्याने निःश्वास टाकला.

दानीयारच्या भुवया उंचावल्या, प्रेमाने व खेदाने तो एवढ्या हळू आवाजात म्हणाला की, मला त्याचे बोलणे ऐकूच आले नाही. मग तो स्वतःच्या गाडीकडे झपझप पावले टाकत गेला, त्याला जणू कसला तरी आनंद झाला होता. तो चालताना नाल कुरवाळत होता.

जामील्याच्या शब्दांमध्ये त्याला कोणते सांत्वन सापडले होते? एखाद्या व्यक्तीने सुस्कारत म्हटले: "मला सोपं जातं असं तुला वाटतं?" तर माणसाला सांत्वन होते?

माल उतरवून झाल्यानंतर आणि परत जायला आम्ही तयार झालो तेव्हा चुरगळलेल्या ओव्हरकोटातील, खांद्यावर पिशवी टाकलेला एक रोड, जखमी सैनिक स्टेशनच्या आवारात आला. काही मिनिटांपूर्वी एक आगगाडी आली. सैनिकाने सभोवार पाहिले व तो ओरडला:

"इथं कुरकूरेऊ खेड्यातलं कुणी आहे?"

"मी आहे!" तो माणूस कोण असावा असे नवल करत मी उत्तरलो.

"कुणाचा मुलगा तू?" माझ्याकडे चालत येत सैनिकाने विचारले. एकदम त्याने जामील्याला पाहिले, तो चकित झाला, तिच्या चेहऱ्यावर आनंदी स्मित उमटले.

"केरीम, तूच ना?" ती ओरडली.

"होय, लाडके जामील्याताई!" तो ओरडला, त्याने तिचा हात गच्च दाबला.

तो तिचा गाववाला होता.

"किती योगायोग! सहज इकडं आलो!" तो उत्तेजित होऊन म्हणाला. "आत्ताच सादिककडून आलो, एकत्र इस्पितळात पडलो होतो, देवाच्या कृपेनं एक-दोन महिन्यात परत येईल. जेव्हा निरोप घेतला तेव्हा त्याला म्हणालो: बायकोला पत्र लिही, मी ते तिला पोचवीन असं वचन दिलं. हे घे ते सहीसलामत!" केरीमने जामील्यापुढे त्रिकोणी पत्र दिले.

जामील्याने पत्र हिसकावून घेतले, ती लाल बनली, मग पांढरी फटक झाली व दानीयारकडे तिने सावध तिरपी नजर टाकली. तो गाडीपाशी उभा होता, त्या दिवशी खळ्यावर पाय फाकून एकाकी उभा होता तसा, अत्यंत निराश डोळ्यांनी तो तिच्याकडे बघत होता.

तेवढ्यात सर्व दिशांनी माणसे धावत आली.

घोळक्यात सैनिकाला त्याचे मित्र व नातेवाईक सापडले. त्याच्यावर प्रश्नांचा मारा झाला. पत्राबद्दल जामील्याने आभार मानण्यापूर्वी दानीयारची गाडी आवाराबाहेर खडखडत धावली, धुळीचा लोट उडवून चाकोरीवर ती हिंदकळत होती.

"त्याचं डोकं फिरलंय!" लोक त्याच्या पाठी ओरडले.

लोकांनी सैनिकाला कुठे तरी नेले, दरम्यान मी व जामील्या आवाराच्या मध्यभागी उभे होतो, वेगाने विरत जाणाऱ्या धुळीकडे आम्ही पहात होतो.

"चल जेने" मी म्हणालो.

"तू जा, मी एकटी राहते!" ती कडवटपणे म्हणाली.

अशा रीतीने प्रथमच आमच्यापैकी प्रत्येकजण एकेकटा परत आला. कोंदट उष्णतेमुळे माझे तडकलेले ओठ जळजळत होते. तडकलेली, भाजलेली जमीन उन्हापायी पांढरी बनली होती, दिवसाची उष्णता कमी होत होती, जमिनीवर राखी खाऱ्या कणांचा थर बसत होता. खारट पांढऱ्या धुक्यात अस्थिर, आकारहीन सूर्य थरथरत होता. अंधुक क्षितिजावर तांबडे वादळी ढग एकवटत होते. कोरड्या वाऱ्याच्या झोतांनी घोड्यांच्या तोंडांवर पांढऱ्या धुळीचे थर माखले होते, वारा त्या धुळीला त्यांच्या आयाळींवर मागे उडवत होता, टेकाडांवरच्या दवण्याच्या झुबक्यांवर ती धूळ उडत होती.

"पाऊस पडेल काय?" मी विचार केला.

मला खूप एकाकी व अस्वस्थ वाटले! मी घोड्यांवर चाबूक उडवला, कारण ते जवळ जवळ चालत होते. हडकुळ्या, लांब पायांचे माळढोक पक्षी घळीत धावत गेले. रस्त्यालगत काटेरी झुडुपांची पाने विखुरली होती, आमच्या भूमीवर ही झुडुपे उगवत नाहीत. कझाख बाजूने वाऱ्याने ती उडवून आणली असावीत. सूर्य खाली गेला. दृष्टिपथात चिटपाखरू नव्हते, उन्हाने थकलेल्या स्तेपविना दुसरे काही दिसत नव्हते.

झोडपणीच्या खळ्यावर मी पोहोचलो तेव्हा अंधार पडला होता. वातावरण स्तब्ध होते व वारा पडला होता. मी दानीयारला हाक मारली.

"तो नदीवर गेलाय," पहारेकरी उत्तरला. "उकडतंय खूप, सगळे घरी गेले, वारा नसताना इथं काम मुळीच नाही!"

मी घोड्यांना कुरणावर नेले आणि नदीवर जाण्याचे ठरविले. कड्याजवळची दानीयारची आवडती जागा मला ठाऊक होती.

तेथे तो गुडघ्यांमध्ये डोके खुपसून बसला होता, खाली खळाळणाऱ्या पाण्याला ऐकत होता. त्याच्यापाशी चालत जावे, त्याच्या गळ्याभोवती हात टाकून, काहीतरी सांत्वनपर बोलावे अशी माझी इच्छा होती. पण मी काय बोलू शकत होतो? मी बाजूला उभा झालो व शेवटी मागे वळलो. त्यानंतर खूप वेळ

गवतावर पडून राहिलो, ढगांनी काळवंडलेल्या आकाशाकडे बघत होतो. आयुष्य एवढे गुंतागुंतीचे आणि समजण्यास अवघड का असावे, ह्याचे मी नवल करत होतो.

जामील्या अद्याप परतली नव्हती. तिला काय झाले होते? मी जरी खूप दमलो होतो, तरी मला झोप येईना. ढगांच्या कडांना डोंगरांवर विजा चमकत होत्या.

जेव्हा दानीयार खळ्यावर परत आला, मी अजून जागा होतो. तो निरुद्देशपणे सभोवती फिरत होता. त्याचे लक्ष रस्त्याकडे होते. मग गवतावर माझ्यापाशी तो पडला. तो नक्की खेडे सोडून जाईल असे मला वाटले. पण तो कुठे जाणार? तो एकटा आणि बेघर होता. त्याची कुणीही वाट पहात नव्हते. झोपता झोपता जवळ येणाऱ्या गाडीची खडखड मला ऐकू आली. बहुधा जामील्या परतत येत असावी.

किती वेळपर्यंत मी झोपलो होतो हे मला माहीत नाही. माझ्या कानापाशी गवत सळसळले. कुणीतरी जवळून गेले होते, माझ्या खांद्याला जणू ओल्या पंखाचा स्पर्श झाला. मी डोळे उघडले. ती जामील्या होती. ती नदीवरून आली होती, तिचा पोषाख ओला होता. ती थांबली, भोवती चिंताक्रांत नजर टाकून दानीयारशेजारी बसली.

"दानीयार मी आले आहे, मीच आले आहे," ती हळूच म्हणाली.

सर्व शांत होते. विद्युल्लतेचा एक झोत आवाज न करता जमिनीवर सरकला.

"रागावलास? खूप रागावलास?"

पुन्हा शांतता. मग मातीचे ढेकूळ पाण्यात पडल्याचा आवाज झाला.

"माझा काय दोष? तुझासुद्धा दोष नाही..."

डोंगरात मेघगर्जना गडगडली. विजेच्या प्रकाशात जामील्याचा तिरपा चेहरा ठळक दिसला. तिने दानीयारला मिठी घातली होती. त्याच्या मिठीत तिचे खांदे गदगदत होते. मग ती गवतावर त्याच्याशेजारी पहुडली.

स्तेपवरून गरम वारा वाहात होता. तो गवताला गरगर फिरवत होता, खळयाच्या टोकाशी असलेल्या एका मोडक्या तंबूवर तो आपटत होता, रस्त्यावर त्याचा भोवरा निर्माण झाला होता. पुन्हा कोरडी मेघगर्जना झाली, निळया विजांनी मेघांना भेदले. ते भीतीदायक आणि उत्तेजक होते. वादळ येत होते, उन्हाळयातील शेवटचे वादळ.

"तुझ्यापेक्षा मी त्याला पत्करीन असं तुला वाटलं?" जामील्या आवेगाने पुटपुटली. "कधीही नाही! त्यानं माझ्यावर कधीही प्रेम केलं नाही! पत्रातून ताजा कलम म्हणून त्यानं नमस्कार धाडला. मला त्याची गरज नाही, उशीरा आलेलं त्याचं प्रेमही मला नको. लोकांच्या बोलण्याची मला पर्वा नाही! खूप काळपर्यंत मी तुझ्यावर प्रेम करते. माझं तुझ्यावर प्रेम होतं

आणि मी तुझी वाट पहात होते. माझं मलाच कळण्यापूर्वी तू आलास आणि मी तुझी वाट पहात होते जणू हे तुला माहीत होतं!"

कड्याजवळ विजेचे वेडेवाकडे लोळ पाण्यात पडले. गवतावर थंडगार पावसाचे थेंब तिरपे पडू लागले.

"जामील्या, माझी लाडकी जामील्या!" दानीयार कुजबुजला. कझाख, किर्घिझ भाषांमधले सगळे प्रेमळ शब्द तो बोलत होता. "मीसुद्धा तुझ्यावर खूप काळपासून प्रेम करतो. खंदकांमध्ये मी तुझी स्वप्नं पाहिली. माझं प्रेम माझ्या मायभूमीत आहे हे मला समजलं, हे, जामील्या, तू होतीस."

"तोंड वळव, मला तुझ्या डोळ्यांमध्ये बघू दे!"

वादळ सुरू झाले.

तंबूचे नमदी छप्पर जखमी पक्ष्याप्रमाणे फडफडत होते. वाऱ्याने खालून पावसाचे सपकारे बसत होते. पावसाच्या मुसळधार सरी कोसळत होत्या, त्या जणू धरतीला चुंबत होत्या. हिमानीप्रमाणे मेघगर्जना आकाशभर सरपटत होती. विजांच्या चकचकाटात डोंगर उजळत होते, घळीत वारा घुमत होता.

पाऊस धो धो कोसळत होता. मी गवतात लपून पडलो होतो, माझ्या काळजाची धडधड मला जाणवत होती. मी आनंदात होतो. प्रदीर्घ आजारानंतर उन्हात येणाऱ्याला जसा आनंद होतो, तसा आनंद मला झाला होता. पाऊस आणि विजांचा प्रकाश गवतामधून माझ्यापर्यंत पोहोचले. मी समाधानी होतो आणि

सस्मित चेहऱ्याने झोपी गेलो. कमी होणाऱ्या पावसाचा अथवा दानीयारच्या व जामील्याच्या कुजबुजण्याचा आवाज ऐकताना मी झोपी गेलो.

पावसाचा मोसम जवळ आला होता. लौकरच शरद येणार. दवण्याचा शारदीय दमट दर्प होता, हवेत ओल्या गवताचा वास पसरला होता. शरदात आमचे काय होईल? काही कारणाने कोण जाणे, पण त्यावेळी मी त्याबद्दल विचार केला नाही.

त्या शरदात दोन वर्षांनंतर मी शाळेत परत गेलो. धडे संपल्यानंतर मी नदीपाशी उंच कडद्यावर येत होतो, आता मृतप्राय आणि निर्जन बनलेल्या खळ्यावर बसत होतो. इथे मी पहिली रेखाचित्रे रेखाटली. माझी चित्रकला मुळीच चांगली नव्हती हे मला तेव्हाही समजत होते.

"हे रंग चांगले नाहीत! अस्सल रंग असले तर किती छान होईल!" मी स्वतःशी म्हणालो. वस्तुतः अस्सल रंग कसे असतात हेच मुळी मला माहीत नव्हते.

खूप काळानंतर छोटया टयूबमधील तैलरंगांचा मला शोध लागला. माझ्या शिक्षकांचे मत बरोबर होते: मला चित्रकला शिकण्याची जरूरी होती. पण शिकणे केवळ स्वप्न होते, कारण माझ्या भावांचा अजिबात पत्ता नव्हता आणि एकुलत्या मुलाला, दोन कुटुंबांच्या पोषणकर्त्याला, जिगिताला माझी आई सोडत नव्हती. तो विषय काढण्याची माझी हिंमत

होत नव्हती. त्या वर्षीचा शरदाचा मोसम खूप सुंदर होता, रंगवण्यासारखा होता.

बर्फाळ कुरकूरेऊ उथळ बनली, प्रवाहातील दगडांचे माथे काळपट आणि शेंदरी शेवाळाने माखले होते. आधीच्या गोठलेल्या थंडीत गुलाबी वाळुंजींचे उघडेनागडे नाजुक देठ लाल बनले होते, पण छोटचा पॉप्लरनी स्वतःची तोकडी पिवळी पाने अजून ताठ राखली होती.

पावसात ' भिजलेले गुराख्यांचे धुरकट तंबू पुरानंतरच्या तांबडचा गवतात काळे ठिपके भासत होते; धुरांडचांमधून कडवट धुरांच्या कुरळया रेषा उमटत. बारकुळी शिंगरे मोठचांदा खिंकाळत, घोडचा दूर वाहात जात होत्या. वसंतापर्यंत त्यांना कळपात राखणे अवघड होते. डोंगरातून उतरलेले कळप खुरटचा गवतात फिरत होते. सुकलेल्या, काळपट स्तेपमध्ये चाकोऱ्यांच्या आडव्यातिडव्या रेषा उमटल्या होत्या.

लौकरच स्तेपचा वारा वाहू लागला, आकाश गढूळ बनले, हिमवर्षावाचे अग्रदूत असलेले थंडे पाऊस पडू लागले. एका सुरेख दिवशी मी नदीवर गेलो, वाळूच्या पट्टचावर डोंगरी ॲशचे लालबुंद झाड पाहून मी त्याच्याकडे आकर्षित बनलो. गुलाबी वाळुंजींमध्ये मी बसलो, पायउताराच्या जागेपासून मी जवळच बसलो होतो. संध्याकाळ पडत होती. अचानक दोन माणसे मी पाहिली. ती पायउतार ओलांडून आली

होती. दानीयार आणि जामील्या येत होती. त्यांच्या चिंताक्रांत, निर्धारित चेहऱ्यांवरून माझी नजर टळेना, दानीयारने खांद्यावर पिशवी अडकवली होती. तो झपझप चालत होता, त्याच्या ओव्हरकोटाच्या किनारी त्याच्या जुनकट बुटांवर आपटत होत्या. जामील्याने पांढरा रुमाल डोक्यावर तिरपा बांधला होता, तिने तिचा सर्वांत उत्तम फ्रॉक घातला होता, जत्रेच्या दिवसात ती हा फ्रॉक वापरायची. त्यावर गोधडीची बंडी तिने घातली होती, तिच्या एका हातात एक छोटे गाठोडे होते, तिचा दुसरा हात दानीयारच्या पिशवीच्या पट्ट्यावर होता. ती बोलत होती.

टोकदार गवताच्या जाळीतून ती घळीतून जात होती. मी त्यांना बघत होतो, काय करावे हे मला समजेना. त्यांना हाक मारावी? मी एकही शब्द उच्चारू शकलो नाही.

वेगाने सरकणाऱ्या ढगांवरून घसरत शेवटचे किरमिजी किरण डोंगरावर पडले. एकदम अंधार पडला. रेलरस्त्याच्या फाट्याकडे जाणाऱ्या दानीयारने व जामील्याने एकदाही मागे वळून पाहिले नाही. गवताच्या जाळीतून त्यांची डोकी एक-दोनदा वर-खाली होत होती व नंतर ती पूर्ण अदृश्य बनली.

"जामील्या ...!" मी बेंबीच्या देठापासून ओरडलो.

"ल्या ...!" एकाकी प्रतिध्वनी आला.

"जामील्या ...!" मी पुन्हा ओरडलो आणि नदी ओलांडून वेड्यासारखा त्यांच्या मागे धावू लागलो.

बर्फाळ थेंबांचे तुषार माझ्या तोंडावर आपटले. माझे कपडे ओलेचिप्प बनले, पण मी पुढे धावत होतो, पायांखालची जमीन मी बघत नव्हतो. मग मी घसरून खाली पडलो. पालथ्या पडलेल्या माझ्या तोंडावरून गरम आसवे वाहात होती. मी डोके न उचलता तसाच पडून राहिलो. अंधार जणू माझ्या खांद्यांवर खाली उतरत होता. टोकदार गवताचे सडपातळ देठ शोकाने विव्हळताना मी ऐकले.

"जामील्या! जामील्या!" मी हुंदकत होतो.

मला अत्यंत निकट असलेल्या आणि प्रिय असलेल्या दोन माणसांचा मी निरोप घेत होतो. जमिनीवर तेथे पडून राहिलेल्या अवस्थेत एकदम मला जाणीव झाली की, मी जामील्यावर प्रेम करत होतो. ती माझे पहिले प्रेम होती, माझ्या बालपणातील प्रेम होती.

खूप वेळपर्यंत मी तेथे पडून होतो, माझ्या ओल्या हातांमध्ये माझे डोके खुपसून होतो. केवळ दानीयारचा आणि जामील्याचा माझा वियोग घडत नव्हता, माझ्या बालपणाशी माझा वियोग घडत होता.

शेवटी मी जेव्हा अंधारातून घरापर्यंत धडपडत गेलो तेव्हा अंगणात खूप गोंधळ माजला होता: रिकीबी खणखणत होत्या, लोक घोड्यांवर खोगीरे टाकत होते आणि झिंगलेला ओस्मोन मोठमोठ्याने ओरडत घोड्यावरून नाचत होता.

"ह्या हलकट कुत्र्याला केव्हाच गावातून हाकलून लावलं पाहिजे होतं! सबंध कुटुंबाची अब्रू घालवली त्यानं, जागच्या जागी ठार मारीन! मला शिक्षा झाली तर बेहत्तर! आमच्या बायका पळवायला प्रत्येक भटक्याला मी संधी मिळू देणार नाही! जिगितांनो, बसा घोड्यांवर, त्याला जाऊ देऊ नका, स्टेशनापर्यंत गाठू!"

मी थिजलो: कोणत्या वाटेने ते दौडतील? पण रेलफाटयाकडे न जाता ते हमरस्त्याने गेले ह्याची एकदा खात्री पटल्यानंतर मी घरात हळूच सटकलो आणि माझ्या वडलांच्या ओव्हरकोटात मुरकुंडी मारून बसलो, कुणालाही माझे अश्रू दिसू नयेत म्हणून मी डोक्यावर आच्छादन घेतले होते.

त्यानंतर गावात किती चर्चा आणि किती कुचाळक्या झाल्या! जामील्याचा धिक्कार करण्यात बायकांमध्ये जणू स्पर्धा लागली होती .

"अशा कुटुंबाला सोडणारी ती महामूर्ख! तिनं स्वतःच्या सुखाला पायांखाली तुडवलं!"

"कशाला त्याच्याकडं भुलली?"

"काळजी करू नको, सुंदरी लौकरच ताळ्यावर येईल, पण खूप उशीरा!"

"सादिकमध्ये कमी काय होतं? तो चांगला नवरा आणि पोषणकर्ता नाही? गावातला सर्वांत उत्तम जिगित आहे!"

"आणि सासू कशी आहे? देव अशी सासू

प्रत्येकीला देत नाही! अशी बायबिचे सापडणार नाही! मूर्खेनं निष्कारण स्वतःचा घात केला!"

जामील्याला नावे न ठेवणारा एकटा मी होतो. दानीयारचा ओव्हरकोट जुना होता, त्याच्या बुटांना भोके होती, पण आम्हा सर्वांपेक्षा तो श्रेष्ठ होता. त्याच्याबरोबर जामील्या असुखी होईल ह्यावर माझा विश्वास, नव्हता. फक्त आईची मला कीव यायची. जामील्याबरोबरच तिच्या अंगातील पूर्वीची ताकद निघून गेली होती. ती भयाण आणि भेसूर दिसत होती. सगळ्या जुन्या घडीला दैव विस्कटून टाकील ह्याला स्वीकारणे तिला अशक्य झाले होते असे आता मला समजते. वादळात उन्मळून पडलेला वृक्ष पुन्हा उठणार नाही. पूर्वी माझी आई फार मानी होती, सुईत दोरा ओवून द्यायला कुणाला सांगायची नाही. एके दिवशी मी शाळेतून आलो तेव्हा तिचे हात थरथरताना मी पाहिले. सुईचे भोक तिला दिसेना आणि ती रडत होती.

"दोरा ओवून दे!" जड सुस्कारत तिने मला सांगितले, "जामील्याचा नाश होणार. किती छान गृहिणी बनली असती! पण ती गेली... आपल्याला टाकून गेली... कशाला ती गेली? इथं तिचं वाईट चाललं होतं?"

आईला मिठी मारावी, तिचे सांत्वन करावे, असे मला वाटत होते, दानीयार कसा माणूस आहे हे

तिला समजावून सांगावे, पण माझा धीर झाला नाही, मी तिचा सबंध आयुष्यभर अपमान केला असता.

पण त्या प्रकरणात माझी भाबडी भूमिका एके दिवशी उघडकीला आली.

लौकरच सादिक परतला. स्वाभाविकच त्याला दु:ख झाले. जेव्हा तो झिंगला, त्याने ओस्मोनला म्हटले:

"गेली – खुशाल जाऊ दे. कुठंतरी सडत पडेल. आपल्याला भरपूर बाया मिळतील. सोनेरी केसवाली बाईसुद्धा भिकार पोराला मिळते."

"खरं आहे!" ओस्मोन उत्तरला. "तेव्हा तो माझ्या हाती सापडला नाही हे वाईट झालं, तिथल्या तिथं ठार मारलं असतं! तिचे केस घोड्याच्या शेपटीला बांधले असते. बहुधा दक्षिणेकडं कापसाच्या शेतांकडं गेली असतील, किंवा कझाखांकडं. भटकायची त्याची पहिलीच वेळ नाही. माझ्या डोक्यातून हा विषयच जात नाही, कसं हे घडलं, कुणालाही समजलं नव्हतं, असा विचारच कुणाला सुचला नाही. तिनंच हे सारं रचलं असावं कुलटेनं! मी तिला...!"

असे शब्द ऐकून मला ओस्मोनला म्हणावेसे वाटायचे: "गवतकापणीच्या वेळी तिनं कशी कानउघाडणी केली हे विसरू शकत नाहीस! तू नालायका!"

शाळेतील भित्ती-वृत्तपत्रासाठी मी घरात बसून चित्र काढत होतो. आई चुलीशी खटपटत होती.

सादिक अचानक खोलीत आला. त्याचा चेहरा पांढरा पडला होता. तो तिरप्या नजरेने पहात होता, माझ्याकडे धावत येऊन त्याने कागदाचा कपटा माझ्या चेहऱ्यासमोर धरला.

"हे तू काढलं?"

माझी वाचा बसली. ते माझे पहिले चित्र होते. कागदाच्या कपटयावरून माझ्याकडे पाहणारा दानीयार व जामील्या जिवंत झाल्याचे भासले.

"होय."

"कोण आहेत?" कागदावर बोट रोवत त्याने विचारले.

"दानीयार."

"विश्वासघातकी!" सादिक ओरडला.

त्याने चित्राचे तुकडे तुकडे केले व पायांखाली त्यांना तुडवले. दार आपटून तो निघून गेला.

दडपणाऱ्या प्रदीर्घ शांततेनंतर आईने विचारले:

"तुला माहीत होतं?"

"होय."

चुलाण्याशी टेकून किती दुखऱ्या नजरेने ती माझ्याकडे पहात होती! जेव्हा मी म्हणालो: "मी आणखी चित्र काढीन!" तिने दुःखाने असहायपणे डोके हलविले.

फरशीवरच्या कागदाच्या तुकडयांकडे मी बघितले, दुःखाने माझा जीव घुसमटला. खुशाल मला विश्वासघातकी समजोत. कुणाचा मी विश्वासघात

केला? कुटुंबाचा? आमच्या कुळाचा? पण मी सत्याचा, जीवनाच्या सत्याचा, विश्वासघात केला नव्हता. त्या दोन माणसांच्या सत्याचा. त्याबद्दल मी कुणालाही सांगू शकत नव्हतो. आईसुद्धा मला समजू शकली नसती.

माझ्या डोळ्यांसमोर सर्व गोष्टी तरंगू लागल्या. कागदाचे तुकडे जिवंत भासू लागले, फरशीवर फिरत होते. दानीयार आणि जामील्या कागदावरून ठळकपणे माझ्याकडे बघत होती, अचानक दानीयारचे गाणे ऐकू आल्याचा भास झाला, त्या अविस्मरणीय ऑगस्टच्या रात्री त्याने गायले होते ते गाणे. खेड्यातील त्यांचे प्रयाण आठवून रस्त्यावर जाण्याची मला अदम्य इच्छा झाली. त्यांच्याप्रमाणे ठामपणे, धैर्याने मी जाईन, सुखाच्या मार्गावर प्रवेश करीन.

"मी शिकायला जाईन... बाबांना सांग. मला चित्रकार व्हायचंय!" मी आईला ठामपणे म्हणालो.

मला ती दूषणे देईल, ती रडेल, युद्धात ठार झालेल्या भावांची आठवण काढेल, अशी मला खात्री होती. पण आश्चर्य म्हणजे ती रडली नाही. फक्त दुःखाने आणि हळू म्हणाली:

"जा... माझ्या पिलांना आता पंख फुटलेत... किती उंच उडाल हे कुणाला माहीत? कदाचित तुमचं खरं असेल. जा... तिथं गेल्यानंतर विचार बदलेल, चित्र काढणं आणि रंग फासणं हा धंदा नव्हे.

शिकल्यानंतर समजेल... स्वतःच्या घराला विसरू नको."

तेव्हापासून छोटे घर आमच्यापासून वेगळे झाले. मी लौकरच शिकायला गेलो.

अशी ही कहाणी.

चित्रकलेच्या विद्यालयात शिक्षण पूर्ण केल्यानंतर माझी प्रबोधिनीत पाठवणी झाली. अनेक वर्षांच्या माझ्या स्वप्नातील चित्राला मी पदवीसाठी सादर केले.

अर्थात दानीयारचे व जामील्याचे ते चित्र होते. शरदातील स्तेपच्या रस्त्यावरून ती चालत आहेत. त्यांच्यासमोर अफाट व तेजस्वी क्षितिज आहे.

माझे चित्र निर्दोष नाही, कारण कसब पटकन अवगत होत नाही, मी ते जपून ठेवले, कारण माझा तो सृजनाचा पहिला अनुभव आहे.

आता मला अपयशे येतात, काही अवघड क्षण येतात. जेव्हा स्वतःवरचा विश्वास उडू लागतो, तेव्हा ह्या चित्राकडे मी ओढला जातो, दानीयारच्या आणि जामील्याच्या चित्राकडे. खूप वेळपर्यंत मी त्यांच्याकडे पाहतो आणि प्रत्येक वेळी त्यांच्याशी बोलतो:

"कुठं आहात तुम्ही आता, कोणत्या वाटांवरून चालताय? आमच्याकडे स्तेपवर खूप नव्या वाटा आहेत, सर्व कझाखस्तानभर, अल्तायपर्यंत आणि सैबेरियापर्यंत! अनेक धाडसी लोक तिथं काम करताहेत. कदाचित तुम्ही तिथं पोचलात? माझ्या जामील्या, मागे वळून न पाहता तू विस्तीर्ण स्तेपमधून

गेलीस. कदाचित दमली असशील, तुझा स्वतःवरचा विश्वास उडाला? दानीयारचा आधार घे, त्याला प्रेमाचं, धरतीचं, जीवनाचं गीत गाऊ दे! स्तेप त्यात सर्व रंगांमध्ये फुलू दे! त्या ऑगस्टच्या रात्रीची आठवण तुला होवो! पुढं जा, जामील्या, खंत करू नको, स्वतःच्या अवघड सुखाचा तुला शोध लागला!"

मी त्यांच्याकडे पाहतो–आणि दानीयारचा आवाज ऐकतो. तो मला वाटेवर बोलावतोय, म्हणजे जायची वेळ झाली. मी स्तेपमधून स्वतःच्या गावी जाईन. तिथे नवीन रंग शोधेन.

माझ्या कुंचल्याच्या प्रत्येक फटकाऱ्यामधून दानीयारचे गीत उमटो! माझ्या कुंचल्याच्या प्रत्येक फटकाऱ्यातून जामील्याच्या काळजाचा ठोका उमटो!

